मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

★



नटवर्य श्री. सखारामपंत जोशी

विदर्भ साहित्य संघ
मुखपत्र

जून १९५०

★

या अंकांत—

गो. रा. दोडके	१
प्रा. व्यं. रा. बनमाली	१
अनन्त आठले	१
मधुकर मंगरूळकर	१
उ. रा. गिरी	२
ना. रा. शेंडे	२
तु. ना. काटकर	२
सौ. इंदुमती शेवडे	२
वसंत मोहरील	२
सौ. इंदुमती गंधे	२
प्रा. कु. तारा पोतदार	२
वाणी विलास	

★

संपादक :
वामन कृष्ण चोरघडे

वर्ष ५ वें अंक ६

किंमत आठ आणे

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्रऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष पांचवें] युगवाणी [अंक सहावा

जून १९५०

वार्षिक वर्गणी पांच रुपये सभासदांना फक्त रु. तीन

'वाणी'चा हा नव्या वर्षाचा सहावा अंक आहे. आजवर वि. सा. सं. चे नवे सभासद झाले त्यांना जानेवारी पासूनचे अंक आम्ही दिले. आतां यापुढे ते देणें जड जाणार आहे. कारण आतां अंक शिल्लक नाहीत.

'वाणी'कडे येणाऱ्या कवितांसंबंधी एक खुलासा करावयाचा आहे. कविता पुष्कळदा येतात नि त्यांना 'युगवाणी'त सतत स्थान देणे शक्य होत नाही. त्यामुळे माझ्या कवि मित्रांचा मजवर रोष होतो, एकतर मला स्वत:ला कवितेचें फारसें गम्य नाही हें चतुर वाचकांनी एव्हांना जाणलें असेलच. त्यामुळे कवींना माझ्या अज्ञानाने अन्याय होण्याचाहि संभव असतो. सबब जाहीर विनंती अशी की युगवाणीचें काव्याचें ज्ञान आणि स्थान अगदी मर्यादित असल्यामुळे साभारपरतीबद्दल कविमित्रांनी रुष्ट होऊं नये.

'युगवाणी'कडे कथासाहित्य म्हणाव त्या प्रमाणांत व त्या दर्जाचें येत नाही. त्यासंबंधी प्रयत्नांत मी असून वाचकांना समाधान लाभेल अशा कथा लवकरच 'युगवाणी'तून नियमित येतील असा मी भरंवसा देतो.

'युगवाणी'चीं पानें वाढविण्यासंबंधी अनेक पत्रें येतात 'वाणी'च्या वाढत्या लोकप्रियतेचें हें द्योतक आहे. पण पृष्ठें वाढविणें हें माझ्या आवाक्यांत नाही. स्थलाची मर्यादा मलाहि बोचते. 'वाणी'च्या वाचकांनी सभासद वाढविले तर त्या बाबतीत कांही करतां येईल. गेल्या अंकामध्ये प्रत्येक सभासदाने एक सभासद मिळवून देण्याची विनंति संघाच्या हितचिंतकांनी केली होती. त्याकडे मी वाचकांचें लक्ष वेधूं इच्छितों. भंडाऱ्याचे श्री. ना. ल. पोतदार यांनी एकट्याच्या परिश्रमांनी अवघ्या पंधरा दिवसांत ३५ सभासद मिळवून दिले. त्यांचे मी संघातर्फे व 'वाणी'तर्फे आभार मानतों. याच अंकांत स्थलाभावी 'वाणी'ची इतर सदरें देतां आलीं नाहीत. त्याची भरपाई पुढील अंकीं करण्यांत येईल.

याच अनुषंगाने संपादकीयांत एका गोष्टीचा उल्लेख करावासा वाटतो. श्री. मधुकर मंगरूळकर यांनी आपले आतेबंधु डॉ. श्रोत्रीय यांच्या विवाहाप्रीत्यर्थ एकवर्ष युगवाणीचा अंक त्यांना मिळेल अशी व्यवस्था केली. सध्याच्या लग्नसराईच्या दिवसांत वि. सा. सं. ची आठवण अशा रीतीने सभासदांनी ठेवली तर संघाचें यंदाचें उद्दिष्ट साध्य होईल.

२१-५-५०. वामन कृष्ण चोरघडे.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ

१९५०
जून

भां ड ण

गो. रा. दोडके

☆

माझं असं म्हणणं आहे, माणसानं खूब भांडावं, भांडत असतांना खूब तण-तणावं, खूब हातवारे करावे, खूब चिडवावं, खूब रडवावं. भांडावं, असं मी म्हणतों, तेव्हा पुष्कळांना माझं हंसू येईल, आणि ज्यांचा स्वभाव कुत्र्यामांजरांचा आहे ते तर माझ्या मताची व माझीहि धूळधाण करण्याची इच्छा करतील.

हंसोत, पण मी मात्र म्हणणार की भांडावं, खूब भांडावं, मनमानेल तितकं भांडावं.

आजच मी भांडलों आहे, आणि मजेनं भांडलों आहे.

मौज अशी झाली. उद्यां, परवां गांवांत मोहरम. सहजच प्रश्न निर्माण झाला, शाळांना सुटी द्यावी की नाही. सुशी म्हणाली, "द्यावी सुटी."

मी म्हणालों, "नाही देऊं." आणि काय, लागलं तोंड भांडायला. त्या क्षणाला खरं म्हणाल तर मी अशा मजेदार मनःस्थितीत होतों की सुशीनं म्हटलं असतं "पृथ्वी वाटोळी आहे," तर जनार्दन सखाराम गोखल्यांच्या भूवर्णनाच्या तिसऱ्या भागाचीं पहिलीं पानें चांगलीं पाठ असून, गॅलिलिओ कोपर्निकसांचे शोध माहीत असूनहि मी म्हणालों असतों, "छट्, छट्, ! पृथ्वी ? या समोर पडलेल्या खोक्याप्रमाणे चौकोनी आहे." कांहीही म्हटलं असतं तिनं तरी त्याला माझ्याकडून खात्रीनं प्रतिकार झाला असता. एवढ्याचमुळे तिनं सुटी द्यावी म्हणतांच मी एकदम ओरडलोंच म्हणाना, "कांही नाही द्यायची सुटी वगैरे." साहजिकच तिची सुटी देण्याच्या बाबतीत तरफदारीची वकीली सुरू झाली आणि मी हातवारे करकरून तिच्या बोलण्याची अव्हेरणा करायला लागलों. बराच वेळपावेतों हा प्रकार चालला. शब्द प्रतिशब्द, कोट्या प्रतिकोट्या, "बरं बरं, असू द्या" म्हणून मान वेळावणं, सगळं झालं. याप्रमाणे जितक्या जितक्या रीतीनं चिडवणं शक्य होतं, तितक्या सगळ्या रीतीनं एकमेकानं एकमेकांना चिडवून घेतलं आणि अशा रीतीनं भांडणाचा आनंद अगदी पुरेपुर घेतला. यानंतर आम्ही दोघेंहि तासाला निघून गेलों. तास संपल्यावर पुन्हा दोघेंहि एके ठिकाणीं आलों. तेव्हा मी आपल्याशींच अगदी गंभीरपणानं उद्गार काढले, "वा, वा, कसं छान झालं भांडण आज !"

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि नंतर मी सुशीकडे वळून पाहिलं.

त्याबरोबर आम्ही दोघांनीहि असं छान हंसून दिलं की, तिथं बसलेल्या इतर शिक्षक शिक्षकिणींचे चेहरे विस्मयचकित झाले. त्यांना आमच्या भांडणाचा आनंद थोडाच कळणार होता! त्यांच्या विस्मयानं आमच्या हंसण्यावर कांही विरजण घातलं नाही. उलट आणखीच आम्हांला मौज वाटून आमचें हंसणें दोनचार मजल्यांनी आणखी वाढलें मात्र.

मी भांडणाविषयी लिहितो आहे तें जणूं काय अशा रीतीनं की भांडण मला एखादी नवीनच वस्तू सांपडली आहे! जगाला अपरिचित अशा एखाद्या आनंदाच्या साधनाचाच मला लाभ झाला आहे.

भांडत कोण नाही? सगळं जग भांडतं. मानवप्राणीच काय, पण पशुपक्षी, कीटक देखील. सगळी जीवकोटीच काय, पण नदीसारख्या प्रवाही शक्ति देखील. बाग, बाजार, नाटक, संसार कांहीही घ्या. भांडणाशिवाय आढळूनच यायच्या नाहीत ह्या गोष्टी. बागेंत भ्रमर व फुलें यांचा कलरव सदाच कानांवर पडत राहतो. बाजारांत तर देवाणघेवाण चाललेली असतांना भांडणाशिवाय दुसरं कोणतं दृश्यच दिसत नाही. भांडणाशिवाय नाटकाला तर रंगच चढत नाही. नायक व खलनायक यांच्यामध्ये जर भांडण नसेल तर नाटकाचा डोलारा किड्यांनी कोलरून ठेवलेल्या पोकळ खांबाच्या घराप्रमाणे क्षणांत कोसळतो. संसारांतील महान तत्त्वच म्हणजे भांडण. माता कन्या, पिता पुत्र, पतिपत्नी, मित्रमित्र यांच्या भांडणांनीच संसार नाटकांतील प्रवेश घडविले जातात आणि हे प्रवेश जर नाटकांतून कुणी काढून टाकायचा प्रयत्न केला तर संसार मुळी रंगायचाच नाही, सुखाचं तर दूरच राहूं द्या, परंतु संसाराचं अस्तित्वच मुळी राह्यचं नाही.

पण याहिपेक्षा भांडणाला महत्त्वाचं स्थान आहे. इतिहास म्हणजे मानव-जातीच्या आदिकालापासून तो आजच्या अद्यावत क्षणापावेतोंचे अनुभव, मानव जातीला कुणी आत्मवृत्त लिहायला प्रवृत्त केलें तर सगळे इतिहासाचे ग्रंथ ती लिहून काढील आणि या ग्रंथामध्ये प्रामुख्याने आपल्याला काय आढळून येईल तर, सगळीं युद्धपर्यवसायी भांडणं. एवढं मोठं सप्तवार्षिक युद्ध, की ज्या युद्धानं इंग्लंडला साम्राज्यपदावर अचूक आणून सोडलं त्याचं कारण जर आपण पाहूं लागलों तर काय आढळून येईल? मॅडम डी पॅंपेडार व झारिना एलिझाबेथ यांची फ्रेड्रिक दी ग्रेटने केलेली चेष्टा व त्या चेष्टेतून निर्माण झालेलं भांडण म्हणजेच सप्तवार्षिक युद्ध. अशा रीतीनं कोणत्याहि ऐतिहासिक महायुद्धाच्या मागे भांडण असलेलं आढळून येईल.

इतकं जीवनव्यापी, जगव्यापी, विश्वव्यापी व विराट्स्वरूपाचं हें भांडण आहे.

आणि या भांडणांतच—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मानव प्राण्यांची मुडकीं छाटलीं गेलीं आहेत. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या आहेत, अंतःकरणांतील माणुसकीला मूटमाती मिळाली आहे, मानव जातीच्या सुखाचा विध्वंस झाला आहे आणि मानव जातीच्या स्वास्थ्याचा चिचका उडाला आहे.

पण असल्या भांडणाविषयीं मला सहानुभूति वाटत नाही. असलं भांडण मी कधी भांडणारहि नाही. अकारण अथवा सकारण ज्या भांडणांच्या योगाने शत्रुत्वाची भावना निर्माण होते, बळावते व माणसांचीं मनं तुटतात त्यांच्याविषयी माझ्या मनांत घृणा आहे.

मी तिला म्हणालों, " म्हातारीनं कोंबडा झांकला म्हणून कांही तांबडं फुटायचं राहात नाही."

" म्हणजे म्हणतां काय तुम्ही ? " विस्मयनजरेनं ती म्हणाली.

" कुठं हो गेला होतां तुम्ही सुटी काढून ?"

" गेलें होतें अशीच."

" कशाला गेला होतां ?"

" अं ! सहज !"

"काव्य बोलतां आहांत अगदी."

" म्हणजे काय ? "

" अशीच ! अं ! सहज ! अर्थनिष्पत्ती कांहीच नाही आणि अर्थाविना शब्द म्हणजेच काव्य अशी कवींची समजूत असते, नाही कां ? "

" पण म्हातारीचा कोंबडा, तांबडं, काय म्हणालां ? "

" तुम्ही एक गोष्ट लपवून ठेवण्याचा प्रयत्न केला, पण आली ती आमच्या कानावर "

" कोणती म्हणतां ? "

" वेड पांघरून पेडगांवाला जाण्याचा बेत दिसतो आपला."

" मग सरळ सांगाना कोणती गोष्ट ती ?"

"आपलं लग्न ठरलंय ना ! "

आतांवर ती माझ्याशी हंसत खेळत बोलत होती. पण शेवटचं वाक्य माझ्या ओठांबाहेर पडतांच तिच्या मुखावरचं हास्य मावळलं, गालांवर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रक्तिमा आला, डोळ्यांमध्ये क्रोध झळकूं लागला, बोल ऐकायला मिळाले, " तुम्हाला हो काय करायचं माझ्या लग्नाशी ? भारीच बाई नाहीतरी लोकांना चोंबडेपणा करावासा वाटतो !" आणि यानंतर ती माझ्याशी तणतणून भांडली. सगळ्या जगाला तिनं शिव्या दिल्या. मला खूब बोलून घेतलं. आणखी काय काय प्रकार केले. नंतर आम्ही वेगळे झालों. पुन्हा ज्यावेळेला आम्ही परस्परांना भेटलों तेव्हा मी तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला. पण तिचे अजूनहि गाल फुगलेलेच होते. ती एका शब्दानंहि बोलली नाही. मला तिच्या वेडेपणाचं हंसू आलं, राग आला. पण लगेच मला तिची कींव आली. मनाला वाटलं, या बाईला सुखाचं भांडण तर भांडतां येत नाहीच, पण भांडणांतूनहि सुख मिळवितां येत नाही, दुर्दैवी बिचारी !

—अर्थात् असलीं भांडणंहि नाहीं भांडू आणि असल्या माणसांशी भांडण्याचा प्रसंग येऊं देऊं नये कधी.

मी जीं भांडणं भांडावीं म्हणतों तीं वरच्यासारखीं नव्हत. भांडायचं तें गंमतीकरितां, मजेकरितां, पोटभर हंसायला मिळावं म्हणून. लहान लहानशी भांडणं भांडायचीं व ती संपताच चटकन् विसरून जायचं की आपण भांडलों म्हणून. प्रसंगांतलं भांडण विसरून जाऊन त्यांतलं हास्य मात्र जीवाशी जपून ठेवायचं. सुधी व मी नाही कां भांडलों ? पण कांही वेळाने एकत्र येतांच, "किती छान भांडलों आपण आज." म्हणतांच हंसून दिलं. अशाच प्रकारचीं भांडणं भांडण्यांत आनंद आहे. ज्यांना हें शक्य नसेल त्यांनी मात्र भांडण्याच्या भानगडींत पडूंच नये कधी. कारण ते अबोला धरतील, कुचाळ्या करतील, एकमेकांना ओरबाडतील. अर्थात् असल्या भांडणांत सुखाला अवसरच नाही. टॉल्स्टायची एक कथा आहे. तिचं नांव "थोरांपेक्षा धाकटीच शाहणी" हें आहे. या कथेंत त्यानं मोठं मार्मिक दृश्य दाखविलं आहे. दोन लहान मुलं भांडतांत, त्यांचं भांडण भोंवतालचीं वडीलधारीं माणसं उचलून घेतात आणि हमरीतुमरीवर येतात. इतक्यांत एक म्हातारी तेथे येते आणि ती ह्या सगळ्या भांडखोरांचं लक्ष एका दिशेला वळविते. सगळ्यांना दिसतं की ज्यांचं भांडण आपण उचलून धरलं ती लहान मुलं गुण्यागोविंदानं खेळण्यांत रंगून गेलीं आहेत.

या लहान मुलांप्रमाणे माणसांना भांडतां आलं तर "भांडणाचं तोंड काळं" असं कुणालाहि म्हणावंसं वाटणार नाही.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ–समीक्षा

खो गी र भ र ती

प्रा. व्यं. रा. वनमाळी

*

" खोगीरभरती " ! पुस्तकाचें नांव, पुस्तकांतील प्रस्तावना व पुस्तकाच्या शेवटी असलेले आभार या साऱ्या प्रकारांत विनोदाची जी सूक्ष्म छटा दिसते ती साऱ्या लेखसंग्रहांतहि आहे. एखादें लठ्ठ पात्र किंवा काळ्या पोरी निर्माण करून जे हय-हास्य (horse-laugh) निर्माण होतें तसा रानटीपणा या पुस्तकांत सांपडायचा नाही. व्यक्ति, समाज, साहित्य, संगीत, रंगभूमि वगैरे विविध क्षेत्रांत जे सूक्ष्म दोष असतात त्यांच्या आधारावर हा विनोद उभारला आहे. कुरूप माणसाला आपण कुरूप आहोंत असें आरशांत पाहूनसुद्धा न कळण्याइतका अहंकार असतो. त्याला त्याचें वैगुण्य चारचौघांनी दाखवून दिलें तर त्याला पटण्याचा संभव आहे. त्याचप्रमाणे समाजांतील ढोंगें, लब्धप्रतिष्ठित माणसांचा दंभ, आपल्या चालीरीतींतील पोकळपणा, संगीत, साहित्य, रंगभूमी, या क्षेत्रांतील खुळें (.fads.) हीं सारीं कोळिष्टिकें, आपल्याला कुणीं दाखविलीं तर त्याचें स्वागतच केलें पाहिजे.

समाजांतले दोष दाखवायचें असल्यास त्या दोषांबरोबर हंसून (laugh with), हंसतां हंसतां त्या दोषांचे दांत पाडणें हा एक मार्ग ! व त्या दोषावर प्रहार करून (laugh at) दांत विचकणें हा दुसरा मार्ग !

या दोन्ही अस्त्रांचा या पुस्तकांत उपयोग केला आहे. यातील सतरा लेखांतले एकदोन वगळल्यास बाकीच्या साऱ्या विनोदकथा रंगभूमि, संगीत व साहित्य या तीन प्रमुख प्रांतातला भंपकपणा दाखवितात. " नाटक कसें बसवतात ? " या पहिल्या लेखांत नटनटी, दिग्दर्शक, तबलेवाले, पडदेवाला, नाटककार, टीकाकार या सर्वांची हांसत हजेरी घेतली आहे. संगीत प्रांतातला झब्बूपणा "गायनी-कला", "सुरंगा सासनेडकर" व "विसंगत-संगीत" ह्या लेखांत दाखविला आहे व साहित्यक्षेत्रांतली घाण "यंदाचें साहित्यिक भविष्य", "एका नूतन अमूल्य ग्रंथावरील अभिप्राय", "आणखी एक रस", "आणखी एकच प्याला' ह्या लेखांत उघडकीला आणिला आहे. अनुषंगाने टीकाशास्त्र, इतिहाससंशोधन

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यावरील प्रहार झणझणीत आहेत व कुठल्याहि मोठ्या गांवांत जीं खुळें (fads) दिसतात—उदाहरणार्थ, बालशिक्षण, समाजसेवा, भाषाशुद्धि त्यावरहि तडाखे उडवले आहेत. मोठ्या व्यक्तींचे जे आवडते नियम असतात त्यांचाहि मर्मभेद केला आहे. ज्याला इंग्रजीत Mock-heroic style म्हणतात त्या पद्धतीचें उत्कृष्ट प्रत्यंतर या पुस्तकांत सांपडेल!

यांतील कांही मिरची-चिमट्यांचा अनुभव आपण सगळे मिळून घेऊं या! "नाटक कसें बसवतात?" या लेखांतले हे चिमटे बघा—

(१) "हिरॉईन हीरोने दिलेल्या वेणींतली फुलें चुरगाळून दोरा बंडलाला गुंडाळून ठेवते तो प्रसंग असेल. राइट! मला त्या ॲक्शनमधून हिरॉईनची कॅरेक्टर डेव्हलप् करायची आहे!" हा दिग्दर्शक ओ. भुजंगराव बेरें का!

(२) "आपल्या बायकोचें पंचाहत्तर हजारांचें कॉन्ट्रॅक्ट होणार असल्याची बातमी दुसऱ्याला देतो व त्याच्याकडून विडी मागून घेतो." हे दोन नट हं!

(३) "ह्ये पा त्या तिस्रा अंकातली भयरवीची स्चुवेशन मातरी आयली कडेनच घेया हां! भयरवी यक्दं लॉष्ट पडल्यावर आडयन्स थांब्त नाय् भुजंग्राव?" हा हिरॉईनचा मामा फट्टू पणजीकर!

(४) "लवकर निघेल ना नाटक?"

"कां?" ओ. भुजंगराव विचारतात.

"कारण आणखी दोन-तीन महिन्यांनी मला काम नाही करतां येणार."

"कां?"

"इश्य!"

ही साईड हिरॉईन सौ. क. बेरें!

(५) "भले, नाटकांतल्या गाण्यांचा अर्थ? आज वीस वर्षे चाली लावतोंय् महाराजा! 'कुवलय मुख तिला अजि कमला विनवी तुला मला,' चला, लावा, अर्थ!" हा संगीत दिग्दर्शक!

(६) "ह्या अंकाला मी पातळ कुटलं नेसू?"

"कुठलंच नेसू नका"! ही हिरॉईन मिस् कामिनी नेलकर!

(७) "दोन अवर्स नुसते वेस ऑफ टाइमस् झाले. मला आतां हिज मास्टरमध्ये जायचंय व्यलसलला. उद्यां बिगिनपासून माझंच घ्या! अन्सेरी वेस ऑफ टॉईम. सिन्सिरनस् नाही तर मूड डेव्हलप्मेंट कशी सक्सेस करून दाखवायची." रंगरावाची भूमिका करणारा हा मास्टर सुदर्शन!

(८) "गोविंदराव, मिशा कां काढल्यास?"

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" पडत होत्या "

" पुन्हा लावा "

स्पिरिटगमची बाटली सांडली आहे." ही रंगीत तालीम.

(९) "म्याणिजर यास नमस्कार विनंती विशेष—मी आज दुपारच्या गाडीने वरोड्याला नयेनताराबाईबरोबर यांचा जलसा वाजवायला जात असल्यामुळे मला तिन दीवस रजा द्यावी." हे प्रो. भुजंगराव पंढरीनाथ मिटवावकर पि.डिल्वाले!

(१०) " भुजंगराव, कामिनीबाई विचारताहेत कुंकू साधं लावूं की स्वास्तिक!

' आदर्श समाजसेविका ' या लेखांतल्या या कोपरखळ्या बघा :

(१) " पराजयाने त्या नाऊमेद होणाऱ्या नाहीत. त्यानंतर पळींत लिंबाच्या फोडी घालून प्रॅक्टीस करीत करीत यंदा त्याच शर्यतींत त्या दुसऱ्या आल्या. माझ्या प्रिय वाचक भगिनींनो आपल्यापैकी किती जणींच्यांत ही चिकाटी आणि महत्वाकांक्षा आहे बरें !

(२) "एकदा श्री. फुगे हे आजारी असतांना त्यांनी स्वतः गड्याला सांगून डॉक्टरला बोलावणें केलें व डॉक्टरचें औषध आपल्या हाताने ओतून पतीस दिलें. आपल्या पत्नीवर श्री. फुग्यांचे इतके निरतिशय प्रेम आहे कीं पत्नीस आपल्या आजारामुळे होणारे त्रास त्यांच्याने पाहवेनात म्हणून त्यांनी नर्स ठेविली परंतु रात्रपाळीची नर्स ठेविली असूनहि सौ. सत्यभामाबाई पतीच्या खोलींत रात्रभर बसून होत्या."

(३) "त्यांनी स्वत:हि कांही लेख लिहिले आहेत. परंतु त्यांचे विचार इतके तेजस्वी आहेत की पुरुष संपादकांना ते छापण्याचें धैर्यच होत नाही. त्यांचा 'लाटणीं मोडा आणि लेखणी घ्या' हा लेख तर फारच सुंदर आहे. परंतु तोच लेख पांच वर्षांपूर्वी दुसऱ्या मासिकांत दुसऱ्या बाईने लिहिला होता ह्या सबबीवर परत करण्यांत आला होता."

(४) "अलीकडे त्या नृत्यांचेंहि शिक्षण घेत आहेत. त्यांच्या पतींनी आणि फॅमिली डॉक्टरनी त्यांना ह्या बाबतींत फारच उत्तेजन दिलें आहे. एकदा लेडिज् क्लबच्या स्नेहसंमेलनांतल्या नाटकांत सुप्रसिद्ध स्त्रीभूमिका-प्रधान नाटकें लिहिणारे नाटककार श्री. गां. गो. कामनकर ह्यांच्या "बापींची बाया" या नाटकांत त्यांनी महाराणीचें काम अत्यंत नैसर्गिक रीतीने केलें होतें."

पण सगळ्यांत उत्तम चिमटे व कोपरखळ्या साहित्य व साहित्यिकांच्या वांट्याला आलेल्या आहेत. साहित्यिकांचा दंभस्फोट करतांना देशपांड्यांच्या लेखणीला जास्त धार येतें असें दिसतें. नाटककाराने ट्रॅजेडी लिहिली असतां पहिला अंक संपल्यावर बाहेर येऊन "इतकें विनोदी नाटक आपण पाहिलें नाही." असें अभिनंदन करणारे टीकाकार; "समाजाला अकरणात्मकतेच्या

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्थाणुत्वाकडून करणात्मक गतिमानतेकडे जातांना असलीं कलाविहीन नाटकें प्रतिरोधी ठरतील. याविषयी प्रो. टेनिसन याचें मत पाहा, 'ए ड्रामा शुड बी ए ड्रामा, अँड रिअल ड्रामा इज् ऑलवेज् ए ड्रामा,' ह्या कसोटीला हें नाटक उतरत नाही," अशी टीका छापणारें साप्ताहिक; 'एखादी अत्यंत क्षुल्लक गोष्ट घेऊन (उदाहरणार्थ—"पूर्व-पेशवे कालीन पगड्या") त्यावर संशोधन करतांना गंभीर आव आणून अर्धा पाऊण पान फूटनोट्स्नी भरून काढणारे व अखेर संदर्भ ग्रंथांची लांबलचक यादी देणारे संशोधनकार'—हा असला साहित्यिकांचा मेळावा सगळ्यांना माहित आहे. हें संशोधन कशा प्रकारचें असतें बघायचें आहे? हें एक उदाहरण घ्या! "आतां कांही जण अशी पृच्छा करतील की दगदगींतून काव्य निघालें की काव्यांतून 'दगदग' निघाली"? नंतर या वाक्याखालची टीप बघा, "न्यायशास्त्रांत यास बीजांकुरन्याय म्हणतात; किंवा उर्दु 'फैसलानाम्यांत' 'मुर्गी बैदा फैसल्ला' म्हणतात. 'पहले मुर्गी या पहले बैदा?' (पहा—मूसा कांजीकृत "फैसलानामा" उजवीकडून डावीकडील सातव्या पानांतील खालून वरची पहिली ओळ)"

"आणखी एक रस" हा लेख तुम्ही स्वतः वाचल्याशिवाय माझ्या नुसत्या सांगण्याने, तुम्हाला चांगला कळणार नाही. त्याच्याच तोडीचे दुसरे दोन लेख म्हणजे "यंदाचें साहित्यिक भविष्य" व "आठवणी-साहित्यक व प्रामाणिक" हे होत. एखादा नामवंत साहित्यिक मेल्यानंतर त्यांच्यासाठी स्मारकनिधि जमविणें व त्यांच्या आठवणी (खऱ्या खोट्या) प्रसिद्ध करणें—हा जो खेळखंडोबा आपण बघतों, त्याचें हें उत्तम विडंबन आहे. त्या स्मारक-समित्या, तीं भांडणें, तें खोटें गुणगायन स्मशानावरून परत येतांनाच दुखवट्याच्या समारंभाच्या अध्यक्षपदासाठी धडपड, ते जाहिर हुंदके—"थोर माणसाची नांवें टिकविण्यासाठी त्यांच्या गोतावळ्याचे अनेक उपद्व्याप पाहिले म्हणजे खरोखरीच कींव येते." पण ह्या खोट्या साहित्यिक आठवणींच्या ऐवजी प्रामाणिक आठवणी वाचल्या म्हणजे त्या थोर मृतकवीची खरी किंमत कळते. थोड्या आठवणी काढूं या.

"एकदां कवि मित्रांच्या बैठकींत सहज महाराष्ट्राचा 'शेले' कोण असा प्रश्न निघाला होता. तावडतोब कै. सखारामसूनूंनी माझें नांव सांगितलें होतें. मीहि प्रेमाने त्यांना महाराष्ट्राचें 'कीटस' म्हणत असे." ही साहित्यिक आठवण कवि अश्वमेध उर्फ प्रा. चिं. तु. गोराईकर यांची! याच्या उलट अरुणचंद्र (कुमार साहित्यिक) इयत्ता सातवी याची प्रामाणिक आठवण वाचूं या. "कै. सखारामसूनु सुप्रसिद्ध कवि म्हणून माझी पहिलीच कविता त्यांना दाखवायला गलों. त्यांनी त्या कवितेंत थोडी सुधारणा करावयास हवी असें सांगितलें. पंधरा दिवसांनी त्यांच्या घरीं गेलों तेव्हा ती कविता हरवली असें ते म्हणाले. पुढच्या महिन्यांत तीच कविता एका मासिकांत छापून आलेली पाहिली. त्यांत एकच सुधारणा होती. कवितेखाली माझें नांव खोडून 'सखारामसूनु' असें छापलें होतें."

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असलीच मर्मभेदी टीका "यंदाचें साहित्यिक भविष्य" या लेखांत केली आहे. कोणत्याहि वर्तमान पत्रांतून आटवड्याचें भविष्य सांगण्याची जी प्रथा आजकाल सुरू झाली आहे तीवर लेखकाचा कटाक्ष असला तरी साहित्य व साहित्यिक हेच विनोदविषय आहेत. निरनिराळ्या राशींच्या साहित्यिकांच्या नशीबीं काय लिहिलें आहे हें बघतांना मौज वाटेल.

वृषभ ही बहुतेक साहित्यिकांची, व कन्या ही महाराष्ट्रांतल्या बऱ्याचशा कवींची आणि बहुतेक भावगीत गायकांची रास आहे. टीकाकारांची रास ही वृश्चिक व प्रकाशकांची धन. कांही साहित्य न लिहितां 'साहित्यिक' ठरलेले तथाकथित साहित्यिक मीन राशींत येतात व परवाङ्मयांतील लेखांचें भाषांतर आपल्या नांवावर खपविणाऱ्या साहित्यिकांची रास कुंभ !

तसेंच, " यंदा क्रांतिकारक कादंबऱ्या खपणार नाहीत, तेव्हा ग्रामीण जीवनावर रोख ठेवा " असा वृषभ राशीच्या साहित्यिकांना केलेला उपदेश, ' विवाहित लेखिकांचे पती आपल्या पत्नीचे लेख आवडीने वाचतील ' हें मिथुन राशीच्या लेखिकांविषयीचें भविष्य; ' जुनें वाङ्मयचौर्य उघडकीस येईल. वादविवादांत पडू नका. खाजगींत उखाळ्या पाखाळ्या काढा ' हा सिंह राशीच्या लेखकांना दिलेला इशारा; नवोदित लेखकांस 'कन्या राशीच्या कादंबरीकारांची वाजवीहून अधिक ओळख होऊन गृहकलह माजेल. श्रावणांत पत्नीशी कलह होऊन कलत्र माहेरीं जाईल. माघांत परत येईल. श्रावण ते माघ अत्यंत सुखाचा काळ !'

साहित्यक्षेत्रांत व इतरत्रहि माजलेली ही बेबंदशाही बघून एखाद्याला चीड येणें साहजिक आहे. विनोदबुद्धीने एखाद्या गोष्टीकडे किती वेळ बघणार माणूस ! तीच तीच चूक, तोच तोच भंपकपणा पुन्हा पुन्हा दिसला म्हणजे " Laugh with the man " चे रूपांतर " laugh at the man " मध्यें होणें क्रमप्राप्त आहे. तसा कांहीसा प्रकार —' भाषाशुद्धि—पण जरा निराळी ' या लेखांत दिसतो. नेहमीचे चिमटे किंवा कोंपरखळ्या जाऊन लेखणीला जास्त धार आलेली दिसते, व parody चा मार्ग सोडून Satire कडे लेखणी वळल्याचीं चिन्हें दिसतात.

"आपण आपली व समाजाची कशी प्रतारणा करतों बघा! 'सौभद्र' नाटकांत जखडड कृष्णाने तरूण रुक्मिणीचा ' मजवरि धरी अनुकंपा ' असा अनुनय करायचा—पौराणिक नाटकांत अर्जुनाने इंग्रजी शब्द घुसडून द्यायचे—असे प्रकार घडून सुद्धा धंदेवाईक मालकाने ही रंगभूमीची सेवा असें म्हणावें व अहो आश्चर्य ! झाला प्रकार बुद्धिवादी महाराष्ट्रीय रसिकवृंदाने निमूटपणे पचवावा !

रंगभूमीची सेवा ! हं ! म्हाताऱ्या, बेढब, कुरूप, लोकांनी केलेलें हें भयंकर विडंबन रसिकांनी पैसे देऊन कां सहन करावें ? ही रंगभूमी अशी कोण आहे की तिच्या तैनातीला बिचाऱ्या वृद्धांनीहि राबावें ? की हा सगळा भाषेचा गोंधळ आहे ? भाबडे लोक तर अशा भाषेने शतकांनुशतकें झुलत गुंगत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

राहले आहेत. ' तूं रंगदेवतेच्या गळ्यांतला तन्मणी आहेस ' असें दहा लोकांनी म्हटलें की नकला ओरडणाऱ्या या पुरुषोत्तमाच्या बुडालेल्या पगाराच्या साऱ्या जखमा बुजून निघतात. रात्रीं, बेरात्रीं, अर्धपोटीं जाग्रणें करून तो मालकाला श्रीमंत करतो व स्वत: झातारा झाला म्हणजे नाईलाजाने स्वत:ला फसवीत ' मी रंगभूमीची सेवा करतों ' असें म्हणूं लागतो.

खोट्या भाषेचें हें चकचकीत नाणें प्रत्येक क्षेत्रांत वापरण्यांत येतें. शाळा-मास्तर म्हणे फुलमाळी! स्वत:च्या पोराला वेळेवर खायला न देऊं शकणाऱ्या या दुर्दैवी प्राण्याला गांवच्या पोरांचे चेहरे व मनें फुलविण्याची कामगिरी करतांना दु:ख होऊं नये म्हणून त्याला अगला कितात्र देण्यांत येतो, व साधी राहणी व उच्च विचार सरणी हें तत्त्व त्याच्यासमोर टेवण्यांत येतें.

झोंपडीतल्या निर्मळ आनंदाची तीच गत! माडांच्या राईतलें तें इवलेंसें पवित्र झोंपडें, ती सखू, तो सुभान्या, तें कांदाभाकरीचें सहभोजन, तें स्वर्गीय सुख...पण झोंपड्यांतली ती दैना, तो प्लीन वाढलेला सुभान्या, रोगाने कमरेत वाकलेली व सारखी राबणारी ती सखू आम्ही बघत नाही. भाषेचा मखमली पडदा वर टाकून आम्हीं अशा भ्रमांत वावरत असतों. सारे खोट्या भाषेचे खेळ! मानसिक व सामाजिक नालायकी झाकण्यासाठी ही वेगडी भाषेची महावस्त्रें चढवायचीं!

यासाठी भाषाशुद्धीची चळवळ झाली पाहिजे. कोणी बेजबाबदारपणे रंगभूमीचा उद्धार करण्याची, झोंपडीतल्या निर्मळ आनंदाची, किंवा नव्या युगाचा पाईक असण्याची भाषा बोलूं लागला की त्याला तेव्हाच हटकून ' म्हणजे काय '? असें हडसून खडसून विचारलें पाहिजे. यापुढे जगांतली थोतांडें कमी करायचीं असल्यास सुंदर रेशमी शब्द टिपून न घेतां प्रखर विचार पटवून घ्यायला पाहिजेत."

पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे यांचा हा संग्रह या नवीन प्रकारच्या भाषाशुद्धीच्या आग्रहामुळे मला फार आवडला. ' पानवाला ' किंवा ' लघुकथा कशा लिहाव्यात? ' इथून निघालेला हा प्रवासी अशा भाषाशुद्धीच्या प्रांतांत आला—केवढें हें अंतर दोन बिंदूतलें!

दुसऱ्यांच्या दोषांची सतत चर्चा करण्याऐवजी स्वत:च्याच दोषांची कुचेष्टा करणारा माणूस सगळ्यांना आवडतो, त्याप्रमाणे जीं क्षेत्रें देशपांड्यांना चांगलीं परिचित आहेत व ज्या क्षेत्रांत त्यांनी नांव कमावलें आहे अशा संगीत क्षेत्रांतली—मंगलाष्टकें सुरू होण्यापूर्वी हिंदु वडैं ' घर घरमें दिवाली है मेरे घरमें अंधेरा ' वाजवतो ही विसंगति; जनतेला न कळणारें लिहिणारा तो साहित्यिक (एखादेंच पुस्तक लिहून त्याच्या धुंदीत सारे आयुष्य काढणारा साहित्यिक) असला साहित्य क्षेत्रांतला क्षुद्रपणा; कुणाचें काम करणारा 'अद्वितीय नट' कंट फुटल्यावर कंडक्टर झालेला दिसावा अशी रंगभूमीच्या इतिहासांतली सोंगें—म्हणजे आपल्या कार्यक्षेत्रावर, एकापरी स्वत:वरच टीका करणारा हा लेखक

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

—त्याचें मन निरोगी आहे याचें हें चिन्ह आहे. स्वतः विरुद्धच हंसून दुसऱ्याला हंसविणारा हा तरुण लेखक उद्वेगाच्या भरांत, चीड येऊन, डीन स्विफ्ट किंवा अल्डुस हक्सलेप्रमाणे मनुष्यप्राणी हा घोडा किंवा माकडा सारखा आहे असें मानायला लागला आहे की काय अशी मला भीति वाटते. समाजांतल्या गटारगंगा पाहून त्याचें मन असें कडवट होणें अशक्य नाही, पण तसा परिणाम होऊं द्यायचा नसेल—कारण तसें होणें म्हणजे समाजाचें तें एकप्रकारे नुकसान होईल—तर शुद्ध विचारांची व लख्ख, मद्देतोड, मतांचा आग्रह करणारांची चळवळ हवी!—'खोगीर भरती' या पुस्तकाने एवढें जरी कार्य केलें तरी देशपांड्यांचें हें दुसरें पुस्तक असूनहि त्यांना साहित्यिक म्हणायला मी कचरणार नाही.

—'ऑल इंडिया रेडिओ'च्या सौजन्याने

भर रस्त्यावर वीज चमकली

जनाजनांची रस्त्यामधुनी
घनांसारखी भरती भरली
दोन निळ्या तव डोळ्यांमधली
भर रस्त्यावर वीज चमकली

त्या लोकांना कांहि न कळलें
परि गेलों मी निमिषीं चमकुन
तुझ्या सारखा मीहि कणकण
नवलरसानें गेलों झळकुन

निज नजरेने निर्वच गाणें
घन गर्दीत तूं जें आळविलें
विकल्प विरहित तें मीं मधुमय
मम नजरेने अमूप श्रविलें

लखलखलीं मम आंततत्वें
पुसलें सारें तमिस्र काळें
डोळ्यांमधल्या चपलेच्या तव
ओजाचे मी प्यालों प्याले

पुरे मला तव नील नयनिंची
रस्त्यावर जी हंसली विजली
विभा शशीची—प्रभा रवीची—
विझो अतां विझली तर विझली!

—अनन्त आठले

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नादलुब्धाच्या स्मृतिलहरी— ८

नटवर्य सखारामपंत जोशी

मधुकर श्रीधर मंगरूळकर

१९२२ सालची गोष्ट. हिस्लॉप कॉलेजिएट हायस्कूलच्या स्नेहसंमेलनानिमित्त 'नरवीर मालुसरे' या नांवाचा ऐतिहासिक नाट्यप्रयोग करण्यांत आला होता. त्यांत गोंधळ्यांची भूमिका करणाऱ्या एका चुणचुणित पोराने प्रेक्षकांची मनें आपल्या कामाने आपलेकडे ओढून घेतलीं होतीं. गोंधळ्यांची तऱ्हेवाईक भाषा त्या लहान पोराच्या तोंडांत चांगली बसली होती. लहानपणच्या गोंडसपणांत सरळ नासिका, मोटाले डोळे आणि अकृत्रिम वाटणारा अभिनय या त्रयींनी त्या बालनटाविषयीं मोठ्या आकांक्षा निर्माण झाल्या. चुणचुणित कामावर कडी म्हणूनच की काय, 'भर्जरी कणगीदार—' ही लावणी अस्सल मराठी थाटांत म्हणून, प्रेक्षकांची टाळी कडाडून पडली त्यावेळीच त्या बाल नटाचें भवितव्य नक्की झालें.

नागपूरच्या सखारामपंत जोशांचें रंगभूमीवर आगमन अशा प्रकारे झालें. त्यावेळी इंग्रजी तिसऱ्या वर्गात ते शिकत होते. त्यांच्या अंगगत गुणांची किंचित्‌हि पारख नसतांना, त्यांच्या वर्गशिक्षकांनी त्यांची निवड या भूमिकेसाठी केली हा निव्वळ योगायोगच म्हटला पाहिजे.

त्यांची निवड हा जरी योगायोग म्हटला तरी, ती भूमिका यशस्वी झाली ती मात्र योगायोगाने नव्हे. कोणतीहि गोष्ट मनावर घेतली म्हणजे, वाटेल तीं संकटें मार्गात आलीं तरी तें काम पूर्ण पाडायचें हा जी त्यांची विशिष्ट मनो-भूमिका पुढील आयुष्यांत तयार झाली, ती बीजरूपाने याहि किशोरवयांत त्याच्यांत होती. आपल्या शिक्षकाने आपल्यावर दाखविलेला विश्वास वृथा जाऊं नये म्हणून त्यांनी आटोकाट प्रयत्न केले.

आपल्या मुलाच्या मनोधर्मांची ठेवण लक्षांत घेऊन, त्याप्रमाणे त्यांना मदत करणाऱ्या पालकाप्रमाणे, सखारामपंताचे वडील होते. वामनराव जोशी एक नामांकित कायदेपंडित म्हणून व रसिक, मैफिली माणूस म्हणून प्रसिद्ध होते. रंगभूमीच्या त्या ऐन भरभराटीच्या काळीं त्यांचेंहि एक नाट्यमंडळ होतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

नारायणराव वैद्य, भास्करराव खेर, भाऊसाहेब गोडबोले, डॉ. ल. वा. परांजपे, बळवंतराव पंडित इत्यादि मंडळी त्या क्लबची सभासद होती. सखारामपंतांचे वडील या सगळ्यांत हौशी होते. त्यांना या भूमिकेसंबंधी कळलें तेव्हा त्यांनी रोज सखारामाला अभिनयाच्या संथा द्यायला सुरुवात केली. लावणीच्या चालीपासून तो गोंधळी माणेपर्यंत सारी भूमिका त्यांनी सजवून दिली. गोंधळ्याची भूमिका त्या लहान वयांत यशस्वी रीतीने वठवून दाखविण्यांत, सखारामपंतांची वैयक्तिक कुशलता जितकी जबाबदार आहे तितकेंच त्यांच्या वडिलांची मेहनत आणि प्रोत्साहन कारणीभूत झालें आहे. निरनिराळ्या नटांच्या भूमिका देखील चिकित्सक नजरेने पाहाण्याची संवय त्यांच्या वडिलांनी त्यांना लावली. अंतोबा कुळकर्ण्यांची लक्ष्मीधराची व चिंतामणराव कोल्हटकरांची शकाराची भूमिका पहाण्यासाठी दर रविवारीं, त्यांचे वडील त्यांना राजाराम थिएटरांत पिटाळीत असत. किर्लोस्कर नाटक मंडळीतील श्री. नानासाहेब चाफेकर यांनी पुण्यप्रभावातील 'वसुंधरे'ची भूमिका उत्कृष्टपणे पार पाडल्याबद्दल, त्यांच्या वडिलांनी एक पद्यमय मानपत्र देण्याचा समारंभहि घडवून आणला होता. राजापुरकर नाटक मंडळीशीहि त्यांचा एक भागीदार म्हणून संबंध होता.

लहानपणापासून या प्रकारे सक्रीय उत्तेजन मिळत गेल्यामुळे सखारामपंतांची नटाची भूमिका, पायाशुद्ध रीतीने बनत गेली. या साऱ्या गोष्टींचा आज संकलित परिणाम रंगभूमीवर दिसून येतो. त्यांची भूमिका असलेलें कोणतेंहि नाटक घ्या. त्यांची भूमिका इतराहून एक वेगळेंच वजन मारून जाते. त्यांचें रंगभूमीवरील अस्तित्व इतकें जाणवतें की, एखाद्या प्रवेशांत त्यांचें काम नसलें तर रंगभूमि ओकी ओकी वाटते. सारें नाटकच जणूं त्यांच्या भूमिकेच्या व्यक्तिमत्वाने भारलेलें असतें. यशस्वी अभिनयाचा याहून दुसरा कोणता पुरावा देता येण्यासारखा आहे! एखादा नट त्यांच्या जोडीला काम करीत असतांना बघावा व लगेच दुसऱ्या कुणाच्या जोडींत त्याला पहावें म्हणजे त्यांच्या या गुणाचा अनुभव येईल. सफाईदार पोहणारा असला म्हणजे स्वतः पोहत राहून दुसऱ्याला देखील तो सहज किनाऱ्याला लावतो. पंतांचें असेंच आहे. आपल्या भूमिकेच्या सफाईने ते दुसऱ्याच्या कामाला उठाव आणतात, त्यांत रंग भरतात. इतर पात्रें अशा रीतीने साथ देऊं लागलीं म्हणजे त्यांच्या कामाला कसा उठाव येतो हें पहाण्यासारखें असतें.

या साऱ्या गोष्टींना अनुकूल अशी देहयष्टि त्यांना लाभली आहे. सुडौल शरीर, साडेपांच फुटांची उंची आणि 'पीटा'पर्यंत सहज ऐकूं येईल असा दणदणीत आवाज, ह्या तीन गोष्टी त्यांच्या भूमिका यशस्वी करीत आल्या आहेत.

आम्ही श्री. लाड यांच्या खोलीत बसलों होतों तेव्हाची गोष्ट. रामभाऊ गुळवणी येतांच, त्यांनी पंतांची ओळख करून दिली—

'हे सखारामपंत जोशी—'

 हात जोडून, पुढे केलेल्या खुर्चीवर बसत रामभाऊ म्हणाले—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" वा देवा ! आम्हांला परमेश्वरानं अशी फर्स्ट क्लास फिगर दिली असती, तर नारायणरावांबरोबर कांही काळ आम्ही रंगभूमीवर वजन मारलं असतं कीं— घ्या टाळी—'

त्यांनी हात पुढे केला. रामभाऊंना बोलतें ठेवायचें म्हणजे टाळ्यांच्या तबल्याचा ठेका सदोदित हवा. ती सम घेऊन, ते म्हणाले—

'जोशी बुवा ! तुमची फिगर स्टेजवर अशी झक दिसेल म्हणतां—'

'रामभाऊ ! तुम्ही अजून पुरती ओळख करून घेतली नाहीत. अहो, आमच्या विदर्भांतील नटश्रेष्ठ आहेत हे—'

आता रामभाऊंना आश्चर्य करायची पाळी आली होती. हळूच ते म्हणाले,

" म्हणजे आता सांगा ! माझ्यांतल्या नटाने, पावलें बरोबर ओळखलींत कीं नाही ! जोशी बुवा ! यावेळी तुम्ही घ्या टाळी—' आम्ही सगळे हसलों.

"ब्रह्मदेवाने नाकाडोळ्याची वाटणी केली तेव्हा आम्ही, कुठेतरी तंबोरा घेऊन 'सा ऽ लावीत बसलेले असूं—"

सखारामपंतांनी लहानपणीं ज्या भूमिका आपल्या वडिलांच्या देखरेखीखाली बसविल्या, त्या साऱ्या शालेय जीवनाच्या कारकिर्दीत. मॅट्रिक झाल्यानंतर कॉलेजांत गेल्यावर मात्र त्यांच्या या गुणाचा मध्यंतरी लोप झाल्यासारखें वाटत होतें. शाळेमध्ये कंठ न फुटलेला कोकीळ कॉलेजच्या नंदनवनांत आल्याबरोबर प्रेमाचें कुहू-संगीत गाऊं लागतो. पण सखारामपंताच्या बाबतींत झालें उलट. कदाचित् सायन्ससारख्या रुक्ष विषयांशी संबंध आल्यामुळे त्यांच्या नाट्यवृत्ति वटायला आल्या असतील.

लहानपणी बांधलेलें अभिनयाचें कलम, कॉलेज सुटल्यानंतर मात्र अंकुरित होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. कारण 'साहित्य संपादक मंडळांत' त्यांनी प्रवेश केला. या मंडळाचें नांव त्यावेळीं विशेष गाजत होतें. १९३२ सालच्या एप्रिल महिन्यांत "हाच मुलाचा बाप" नाटक रंगभूमीवर आणायचें ठरलें. पंताच्या वाट्याला डॉ. गुलाबची भूमिका आली. त्यांनी अतिशय मेहनतीने ती भूमिका बसविली आणि रसिकांकडून वहावा मिळविली. लौकिकदृष्ट्या सखारामपंतांना लोकप्रियता व प्रसिद्धि या भूमिकेमुळे मिळाली. एक नवीन नायक उदयाला आला होता. पण हें सौख्य बघण्याचें त्यांच्या वडिलांच्या नशीबीं नव्हतें. कांही महिन्यांपूर्वीच त्यांचा अंत झाला होता.

या भूमिकेपासून मात्र नाट्य हा पंतांच्या जीवनाचा स्थायिभाव झाला. आता रसिक त्यांना सोडायला तयार नव्हते. वेगवेगळ्या भूमिका त्यांच्याकडे चालून येऊं लागल्या. 'भावबंधनांत' 'घनश्याम', 'सत्तेच्या गुलामांत' 'वैकुंठ',

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'श्री' मध्ये 'कुसुमाकर', 'सरलादेवी'त 'मल्लपाल' आणि शेवटी श्री. अनंतराव ओकांच्या 'बायकी कावा'त 'कुमार' या साऱ्या भूमिका बदलत्या भाजणीच्या क्रमाने त्यांनी एकाहून एक सरस अशा केल्या.

'साहित्य-संपादक मंडळा'च्या इतिहासांत 'बायकी कावा' हें नाटक अनेक कारणाने संस्मरणीय ठरलें. या नाटकाला इतकीं वर्षे झालींत, पण त्या संगीताच्या स्मृति मला अजून ताज्या वाटतात. श्री. प्रमोद पंडित व हल्ली दिग्दर्शक म्हणून प्रसिद्ध असलेले, त्यावेळचे नाट्य-मन्वंतरांतील श्री. राजा परांजपे ऑर्गन वाजवायला, श्री. गुणवंतराव वाकेकर तबल्याच्या साथीला अशा थाटांत तो प्रयोग गाजला होता.

'भीमपलासां'तील 'सुखवि चपला चंचला' 'भैरवींतील', 'करपाश विणुनिया गे! चल गुंतवूं शुभांगे', 'देसकारां'तील 'खेळ नंदनी या माझ्या, मानसी विहरती हे राजहंस', 'वलये घेत राजीवा हेलकावा' व 'प्रितीची कुंद कलिका ही—' या पदांनी सखारामपंतानी चांगलेंच वजन मारलें होतें. श्री. गोविंदराव टेंब्याच्या, 'प्रेम हें नितांत तुझें' या चालीवरील, 'चंद्रिका बरा हसता—चांदरात ओसरली' या गझलाने तर किती तरी 'वन्समोअर' घेतले होते. सखारामपंत गद्याचे संगीत नट झाले.

सखारामपंताच्या या यशांत अनेक वाटेकरी होते. कारण सखारामपंतानी संगीताशी इमाने इतबारे कधीच हातमिळवणी केली नव्हती. 'बाथरूमसिंगर्स' म्हणून गायकांचा जो एक वर्ग आहे त्यांत पंताना अग्रस्थानी बसवायला हरकत नाही. आंघोळीला गेले म्हणजे त्यांचें गायन सुरू होतें तें चांगलें तास दीडतासपर्यंत—! त्यांत अब्दुल करीमखाँपासून माणिक दादरकर किंवा लता मंगेशकरापर्यंत सगळ्यांची उजळणी होऊन जाते. एखाद्या दिवशी नाट्यसंगीताची पाळी असते. मग त्या दिवशी स्वयंवर-मानापमान-संशयकल्लोळ सारीं नाटकें चीत होतात. पंत या बाबतींत अग्रवत् आहेत. श्री. भीमसेन जोशी यांनी 'चंद्रिका ही जणु' म्हटलें, यांच्याहि ताना झाल्या सुरूं. लखनौ विद्यापिठाचे श्री. चिंचोरे यांनी गाइलेली रामकलींतील "हरी हरी हरी हरी जपना" ही चीज मीं दुसरेंच दिवशी त्यांच्या न्हाणींतून ऐकली.

संगीत या प्रकारे स्वतःला रिझविण्यासाटीच म्हटल्यामुळे, त्यांच्या गळयाला फिरत आणि पल्लेदारपणा आलेला आहे. पण त्यामुळेच तबल्याशी त्यांचें सुताइतकेंहि सख्य नाही. तो त्यांना नजरेसमोरहि नको असतो.

ज्यांनी 'कुमार'ची संगीत भूमिका पाहिली असेल त्याला हें सारें वाचून आश्चर्य वाटेल पण आंतली 'ग्यानबाची मेख' त्यांना माहित नाही. प्रसिद्ध स्त्री भूमिका करणारे श्रीयुत पोतनीस यांच्याविषयी एक आख्यायिका आहे. अंगावरचा पदर घसरूं नये म्हणून किंवा घसरल्यास तो लक्षांत यावा म्हणून प्रत्येक विंगमध्ये

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मोटा लाईफ-साईज् आरसा लावलेला असे. त्यांत दिसणाऱ्या आपल्या प्रतिबिंबावर खुष होत, ते आपली भूमिका पार पाडीत असत. पंतांच्या वरील भूमिकेच्या वेळी असेंच कांहीसें होई. त्यांचें गाणें आलें म्हणजे मी एका विंगमध्ये उभा अन् दुसरा कुणी तरी पलीकडच्या विंगमध्ये उभा राही. पद सुरू झालें म्हणजे आम्ही सम दाखवायची. आवाज न होऊं देतां, टाळ्या वाजवायच्या. 'काल' आला म्हणजे, 'बाऊंडरी' झाली म्हणजे अंपायर आडवा हात हालवितात त्याप्रमाणे आम्ही हात हालवावा, आणि असा हात हलला की पंतांनी पदाचें तोंड घ्यावें. पं. विनायकबुवा पटवर्धन यांनी अगदी पहिल्यांदा गांधर्व महाविद्यालय सुरू केलें त्यावेळी पंत त्यांत भरती झाले होते, त्या ज्ञानाचा उपयोग 'सम' आणि 'काल' ओळखण्याइतपत या नाटकांत झाला हें काय थोडें झालें! त्यांनी तबलावादनाचे धडे देखील श्री. गुणवंतरावांच्याकडे घेतले होते पण ही भीति कधी गेली नाही. पुढे अनंतराव ओक वारले आणि त्या उत्साहमूर्तीच्या अवतारसमाप्तिबरोबरच 'साहित्य संपादक मंडळा'चा अवतार संपला. सुखाच्या नि दुःखाच्या आठवणी मात्र मागे राहिल्या.

सखारामपंतांच्या दृष्टीने मात्र 'बायकी कावा' हें नाटक दुसऱ्या एका दृष्टीने महत्वाचें ठरलें. त्यावेळीं "नाट्य मन्वंतर" व्यंकटेश थिएटरच्या रंगभूमीवर काम करीत होती. त्यांच्याच सीन्सवर 'बायकी कावा' रंगभूमीवर यायचें होतें. सौ. लीला चिटणीस, श्री. केशवराव दाते, श्री. ठेंगडी, श्री. राजा परांजपे वगैरे कलावंत मंडळी हाजर राहणार होती. नवीन नाटककाराचें नवें संगीत नाटक आणि पोरसवदा नटसंच! साऱ्यांचेंच कसब पणास लागणार होतें.

पहिला अंक पार पडला. केशवराव दाते समोर बसले होते. शेजारी बसलेल्या आप्पाजी पाठकांच्या कानाशी ते लागले. "कुमारा" विषयी त्यांनी चौकशी केली. दुसरा अंक झाला. श्री. दाते उठून रंगालयांत आले. सखारामपंतांचें त्यांनी अभिनंदन केलें व दुसऱ्या दिवशी त्यांनी त्यांना भेटायला यायचें आमंत्रण दिलें.

आप्पाजी पाटकांच्या मार्डीत ही 'पहिली मुलाखात' साधारणपणे दोन तास चालली होती. दात्यांनी त्यांना एकदम प्रश्न केला, " तुम्ही आमच्या मन्वंतरांत येतां कां, बोला! तुमच्यासारखा होतकरू माणूस मला हवा आहे."

आणि त्या भूमिकेचा केशवराव दात्यांच्या मनावर एवढा जबरदस्त परिणाम झाला होता की त्यांनी पंतांना पांच सहा दिवसांत कंपनींत यायला लावलें. नाटकाच्याच रात्रीं जर कुणी पंताला भविष्य सांगितलें असतें की धंदेवाईक नट म्हणून कंपनींत जायची संधी येणार आहे, तर त्यांनी त्याची गणना एखाद्या वेड्यांत काढली असती. नटाचा पेशा करून पैसा कमविण्यापेक्षा केशवराव दात्यांसारख्या नटश्रेष्ठाने आपल्याला आपण होऊन बोलावलें, त्यांच्या सहवासाचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास:महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपल्याला फायदा होईल, या एका उच्च हेतूनेच त्यांनी आपल्या नोकरीवर पाणी सोडलें. नागपूरहून कंपनीचा मुक्काम हलल्यानंतर बर्व्हेला एक सप्टेंबरच्या सुमाराम पंत रुजू झाले आणि केशवरावांनी त्यांना सांगितलें की ९ तारखेच्या आंधळ्याच्या शाळेंत 'विश्वनाथा'ची भूमिका करावयाची. तेव्हा पुढील दोन खेळ होतील तेव्हा नीट ॲक्शन बघून ठेवा.

" पण केशवराव, मला तालीम वगैरे—" त्यांनी भीत भीत प्रश्न काढला.

" तुम्ही नुसतं बघून ठेवा. तुमच्या कर्तृत्वाबद्दल मला खात्री आहे". केशवरावांचा तो विश्वास अर्थातच अनाठायीं नव्हता. त्यानंतर त्यांनी 'मैत्री' मध्ये 'दामले'ची भूमिका केली. ही भूमिका बसवितांना त्यांना केशवराव दात्यांची मदत झाली. लपंडावातल्या 'विनायक'ची भूमिका बसविण्यासाटी दाते त्यांना स्वत: शिक्षण देत होते, पण नाशिकाला कंपनी बंद झाली आणि सारें राहिलें. ज्या हिरीरीने आणि उमेदीने केशवरावांनी त्यांना नागपूर सोडायला लावलें तेवढ्याच दु:खित अंत:करणाने नाशकांत केशवरावाचा निरोप घेतांना, त्यांनी भर स्टेजवर त्यांना जी मीठी मारली तिचें वर्णन करतांना सखारामपंत गहिंवरून येतात. तसें म्हटलें तर केशवराव दात्यांचा आणि त्यांचा सहवासहि पांच सहा महिन्यांचा...परंतु जणुं कित्येक जन्माचे लागेबांधे असावेत असा अकृत्रिम स्नेह त्यांनी संपादक केला. नागपूरचे बाबूराव चिमोटे व सखारामपंत जोशी यांना केशवरावांनी अत्यंत प्रेमाने वागवलें व त्याचाच परिणाम हा की सखारामपंत आज प्रसिद्धीच्या शिखरावर आहेत.

नाट्यमन्वंतराचा अनुभव पाठीशी घेऊन, त्यांनी नंतरच्या कालखंडाला सुरुवात केली. 'अभिनव नाट्यमंदिरा'चें स्टेज त्यांनी गाजविलें. 'संन्याशाच्या संसारा'तील ' श्री ', 'निशिकांताची नवरी' मधील ' निशिकांत ' ' उसना नवरा 'मध्ये बाबूराव या भूमिका त्यांनी नव्या हिरीरीने करून दाखविल्या.

आणि यानंतरचा कालखंड म्हणजे नागपूर नाट्यमंडळाचा इतिहास असें म्हणायला हरकत नाही. 'साहित्यसंपादकमंडळ' नामशेष झालें. नागपुरांतील नाट्यजीवनाला सुस्ती आली. 'मित्रसमाज', 'साहित्य-चर्चामंडळ' वगैरे नाट्यमंडळें इतिहासजमा झालीं. पुन्हा कांही मंडळींनी हातपाय हालविले. नागपूर नाट्य-मंडळाची स्थापना झाली. सखारामपंत म्हणजे मंडळाचा कणा. 'आंधळ्याची शाळा' नाटक ठरलें. नाट्यमन्वंतराची स्मृति ताजी असल्यामुळे, 'त्या' नाटकाचें नाटक होऊं नये या प्रामाणिक इच्छेने ते पहिल्यापासून हें नाटक करूं नये अशा मताचे होते. तशा प्रकारचे 'फ्लॅट-सीन्स' नाहीत मग नाटक कसें करणार नि रंगणार? तेव्हा सरळ दुसरं नाटक घ्यावें नि मोकळे व्हावें हें पंतांचें मत... पण श्री. त्र्यंबकरावबापू चोरघडे यांनी तयार फ्लॅट-सिन्स दाखविले. फर्या तयार झाल्या. 'मनोहर'ची भूमिका पंताच्या वाट्याला आली. पण छे. त्यांचा नकार ठरला तो

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

टरला. आपले गुरु केशवराव दाते यांनी जी भूमिका रंगविली, ती आपण करून, त्या भूमिकेचा अपमान करायचा! नागपूरकरांना 'मनोहर'ची ती विकृत आवृत्ति दाखवायची? प्राण गेला तरी आपण 'मनोहर'ची भूमिका करणार नाही हें त्यांनी निक्षून सांगितलें. इतर मंडळी तर त्यांच्यापेक्षाहि चिवट. नाटक आणि भूमिका टरली ती टरली: तालमी सुरू झाल्या...प्रथम...मनोहरशिवाय ! पंताना तें सारें कसेंसें वाटे. त्यांनी केशवराव दात्यांना पत्र घातलें. आपल्या मनांतील तळमळ लिहून कळविली. त्यांची क्षमा मागितली. मनाची तळमळ चालली होती. तालमींतील आपली भूमिका आपल्या मनाप्रमाणे झाली नाही तर आपण काम करणार नाही या अटीवर तालमी सुरू झाल्या. इतरांना त्यांच्या कुवतीची कल्पना होतीच. त्यांच्या पत्राला ता. ५ नोव्हें. १९४७ ला केशवराव दात्यांचें उत्तर आलें.

"...आपण 'मनोहर'चें काम करणार आहांत. माझें काम आपण अनेकवेळा पाहिलें आहेच आणि त्यामुळेच आपणांस आपल्या कामाची खात्री वाटत नसावी. परंतु मला विश्वास आहे...आपलें काम अत्यंत यशस्वी होईल... आपणांस भारतांतील कथा माहीत आहे काय? द्रोणाचार्यांचा मातीचा पुतळा व त्यासमोर शिक्षण घेणारा तो किरात शिष्य...मला या कथेंतील मथितार्थ इतकाच वाटतो की निदान कलावंत हा तरी खऱ्या अर्थाने कोणाचाच शिष्य नसतो...व्यवहारांत आम्ही ज्या कलावंताना अमुक अमुक घराण्याचा शिष्य म्हणतों त्याने त्या घराण्याची बाह्य वस्त्रें पांघरलीं असतात इतकेंच. वस्तुत: तो स्वयंभू असतो..."

केशवराव दात्यांनी पत्ररूपाने आपले आशिर्वाद पाठविल्यानंतर पंतांना हुरूप आला. त्यांच्या स्वभावांतील गुणविशेष प्रगट होऊं लागला. कोणतेंहि काम हातीं घेतलें म्हणजे तें पूर्णाशाने पार पडेपर्यंत विश्रांती म्हणून घ्यायची नाही. आपण स्वत: खपायचें आणि दुसऱ्याला खपवायचें. तालमीची शिस्त स्वत: अत्यंत कसोशीनें पाळायची अन् दुसऱ्याला पाळायला लावायची. रात्रभर 'मनोहर' ची भूमिका नजरेपुढे आणायची. दात्यांच्या बारिक सारिक ॲक्शन्स आटवायच्या आणि तालमींत त्या घटवायच्या. चिंतन-मनन आणि प्रकटन !

'मनोहर' मूळ स्वरुपांत उभा झाल्याचा दाखला नागपूरच्या रसिकांनी दिला त्यावेळी त्यांना हायसें झालें. केशवरावांच्या अभिनयाच्या श्रेष्ठतेचा एकच प्रसंग सांगतों.

आंधळ्याच्या शाळेतला तिसरा अंक. मनोहरची पूर्व हकीगत चित्रेला समजूं नये म्हणून सुशिला, अण्णासाहेब सारेच आपापल्यापरी प्रयत्न करीत असतात. खेळीच्या तोंडावर जमिनीचा एक तुकडा फेकून तिचें तोंड बंद करावें अशा-प्रकारची सामोपचाराची भूमिका तयार होत असते. तोच विश्वनाथ आंतून येतो आणि या योजनेचा धिक्कार करतो. एकापरी चित्रेला सारें सांगून मोकळें व्हावें

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

असें तो निक्षून सांगतो. त्यावेळीं मनोहरला असह्य होऊन समोरच्या टेबलावरचा पाण्याचा ग्लास झटकन् पिऊन टाकून, तो ताडकन् निघून जातो.

—सखारामपंतांनी तो अभिनय केशवरावांच्या इतकाच हृदयस्पर्शी केला होता.

केशवरावांच्या संगतींत अल्पसा कां होईना, पण समंजस काळ गेल्यामुळे त्यांना एक नवीन दृष्टी आली होती. त्या दृष्टीने त्यांनी 'सोन्याचे देव' मधील बसविलेली भालेरावची भूमिका दात्यांनी पहावी अशी फार इच्छा होती. दात्यांना एकसष्टावें वर्ष लागलें म्हणून त्यांचा सन्मान करावा व त्या निमित्ताने तो प्रयोग व्हावा अशी योजना होती. पण आजारामुळे त्यांना येता आलें नाही.

१९३२ मध्ये केलेली डॉ. गुलाबची भूमिका व अलीकडे केलेली 'मनोहर' ची किंवा ' भालेराव ', या भमिका त्यांच्या विकसित दृष्टिकोणाची साक्ष देतील. 'मनोहर'च्या वरील अविस्मरणीय भूमिकेनंतर, उद्याच्या संसारांतील 'विश्राम', 'दूरचे दिवे' मध्ये 'सदानंद', बेबंदशाही मध्ये ' कलुषा कब्जी ' या भूमिका त्यांनी रंगविल्या. या साऱ्या भूमिका यशस्वी व्हायला त्यांच्या स्वभावांतला जिद्दीपणा कारणीभूत झाला आहे. नाटक पार पडेपर्यंत त्यांच्या जीवाला उसंत नसते.

सखारामपंतांचीं स्वतःचीं कांही खास अशीं मतें आहेत. हिराबाई बडोदे-करांचें गाणें सगळयांना आवडतें म्हणून त्यांना आवडलेंच पाहिजे असें नाही; किंवा इतरांना अगदी सामान्य वाटणारा कार्यक्रम त्यांना असामान्य वाटतो. पण आपलीं वैयक्तिक मतें ते दुसऱ्यावर लादायचा प्रयत्न करीत नाहीत. त्यांच्यातला कलावंत या अशा मतांमुळेच आजपर्यंत जिवंत राहिला आहे. नाट्यनय संघर्षांच्या आवडीनेच कदाचित् त्यांना १९३०–३१ सालच्या असहकारितेच्या चळवळीचें आकर्षण वाटलें होतें. कॉंग्रेस बुलेटिन्सचे ते संपादक होते आणि त्याबद्दल सहा महिन्याचा सरकारचा पाहुणचार त्यांना मिळाला होता.

नागपूर नभोवाणी सुरू झाल्यानंतर त्यांच्या कलेच्या निकासाला एक नवेंच दालन मिळालें. 'सरला भोळे इंदू काळे', 'ज्योति',-'व्यथा' वगैरे नाटिकांतील त्यांच्या भूमिका उल्लेखनीय झाल्या. त्यांच्या सुरवातीच्या भूमिका पाहून, नागपूर नभोवाणी कडून त्यांचें भरपूर चीज होईल असें वाटत होतें. पण त्यांच्यासारखा अनुभवी नट असूनहि त्यांचा फायदा नभोवाणीने योग्य प्रमाणांत घेऊं नये याचें आश्चर्य वाटतें.

नाट्याइतपत त्यांचा दुसरा एक आवडीचा विषय आहे—चिवडा किंवा चिनी बदाम (म्हणजे भुईमुगाच्या शेंगा) यांच्या संगतीत गप्पा मारण्याची त्यांना अतिशय आवड आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

गप्पांच्या बैठकींवरून परत आल्यावर ह्मणा किंवा कोणत्याहि कारणावरून रात्री परत आल्यानंतर आमच्या या बैठकी रंगल्या आहेत आणि या बैठकी आटोपल्यानंतर दारासमोर आह्मी उभ्या उभ्या बोलत राहतों. शेजारी पाजारी खिडक्या उघडून रस्त्यावर बघतात...आणि 'अं हें नेहमींचंच आहे!' असें नाक उडवीत ह्मणून खिडक्या लावून घेतात. आमच्या गप्पा चालतात आणि अशा कितीतरी रात्री संपल्या तरी गोष्टींना खंड पडला नाही. अजून कितीतरी गोष्टी बोलायच्या राहिल्याच आहेत...!

काय ठाऊक कुणास !

माझ्या जीवा क्षीणभार
वाटे उदास उदास
नेत्रीं जडता दुणावे
मंद मंद होई श्वास
अनोळखी तरंगांनी
व्यापियलें अंतरंग
अनाहूत हुरहूर
करी हृदयास गुंग !
मंद तेवणारी रोज
प्रणयाची सांजवात
आज कां न कळे लागे
माझ्या मनोमंदिरांत
कांहीतरी हरपलें
वाटें सुखाचें निधान
उमजेना परि काय
विभ्रमांत भ्रमे मन
येई शिथिलता गात्रीं
गळे उत्फुल्ल मानस
दशा आज अशी माझी
काय ठाऊक कुणास !

—उ. रा. गिरी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

माझी मित्रमंडळी—

शरच्चंद्र मुक्तिबोध

ना. रा. शेंडे

☆

ज्या भारतभूच्या सौंदर्यस्थळीं कवि कालिदासांची काव्यदेवता रमली त्या इतिहासप्रसिद्ध विक्रमादित्याच्या माळव देशांत श्री. मुक्तिबोधांचा जन्म झाला. उच्च शिक्षण पूर्ण होत असतांनाच त्यांची चिकित्सक आणि शोधक दृष्टि आसपासच्या वातावरणांत संचारूं लागली. पण ज्या क्षिप्रच्याकाठीं नयनरम्य देखावे चित्त हारीत असतात, ज्या प्रदेशांत मयूरांचें तांडव नृत्य सुख देत असतें, ज्या ठिकाणी उद्यान शृंगाराचें वैभव मनाला भारून टाकतें त्या रमणीय स्थळीं मुक्तिबोधांचा आत्मा रममाण न होतां, दीनदुबळ्यांच्या जीवनाभोंवतीं घुटमळावा व स्वानुभूतीने त्यांचीं जिवंत चित्रें त्यांनी आपल्या काव्यांतून रेखाटावीं इतकेंच नव्हे तर जातीने त्यांनी त्यांच्या सेवेसाठी झटावें हें नवल नव्हे काय ?

उच्च श्रेणींत बी. ए. एल् एल्. बी. झाल्यावर मुक्तिबोधांनी वकीली सुरू केली. दोन अडीच वर्षे ती त्यांनी चालविली, पण त्यांना वाटायचें की आपलें जीवन त्यांतून कांही व्यक्त करतां येत नाही. त्यापेक्षा अध्यापकाचा धंदा बरा. निदान होतकरू विद्यार्थ्यांच्या मनाची घडण तरी आपण नीट घडवूं शकूं. त्यांनी वकिलीला रामराम ठोकला आणि जबलपूरच्या हायस्कूलांत ते अध्यापक झाले. प्रामाणिकपणे आपली नोकरी बजवायची व उरलेल्या वेळीं श्रमिकांचा जिव्हाळा अनुभवावयाचा असा दोन वर्षे त्यांचा क्रम चालू होता. याच वेळीं ते उत्तम प्रकारे एम्. ए. झाले. पण पुढे ह्या शहरीं त्यांस हवें तें समाधान लाभेना. नागपूर हें मध्यप्रदेशाचें राजधानीचें शहर. त्यांना वाटलें, हें शहर आपल्या कार्यासाठी ठीक आहे. ते नागपूरला आले आणि मध्यप्रदेश सरकारच्या समाजशिक्षण खात्यांतील संपादक-मंडळांत नोकरीला लागले.

नागपुरांत आल्यावर नोकरी व्यतिरिक्त मिळालेला वेळ ते वाचनालयांत, लेखनांत आणि गरीबांच्या जीवनाशीं समरस होण्यांत घालवूं लागले. एकदा दलित वस्तींत लोकवाङ्मयावर भाषण देण्यासाठी आम्हा दोघांना विचारणा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करण्यांत आली. जातांना मुक्तिबोध दलितांचें प्रत्येक घरन् घर न्याहाळून पाहूं लागले आणि श्रीमंत व सुखासीन वर्गाच्या वस्तीशी प्रकट तुलना करूं लागले. ते म्हणाले, 'खरा भारत कुठे असेल तर तो ह्या झोपडींत, खरी भारतीय संस्कृति, प्रेम व जिव्हाळा कुठे असेल तर तो ह्या रात्रणाऱ्या लोकांच्या हृदयांत ! खरी सेवा इथे आहे, खरें कार्य इथे आहे, माणुसकीचा खरा धर्म तो इथेच !' जनसमूहांत मुक्तिबोध भाषण द्यायला उभे झाले. टाळ्यांच्या प्रचंड गजरांत श्रोत्यांनी त्यांचें स्वागत केलें. संतवाङ्मय हेंच खरें लोकवाङ्मय कसें व त्यांत समाजाचें चित्र कसें होतें व आता कसें आहे याची उद्बोधक माहिती मुक्तिबोधांनी इतक्या सुंदर रीतीने सांगितली की त्यांच्या त्या प्रभावी वक्तृत्वाने श्रोते मुग्ध झाले. त्यांच्या भाषणांतील हळुवारपणा, माहिती पटवून देण्याची लकब, भाषणांतील मर्म समजावें म्हणून दृष्टांत देण्याची उत्कृष्ट खुबी इतकी सफाईची होती की श्रोतृवर्ग अगदी प्रभावित होऊन गेला. भाषणानंतर त्या अडाणी लोकांनी मुक्तिबोधांना जेव्हा आपुलकीने आलिंगन दिलें तेव्हा तर सर्व गोष्टींचा माझ्या कयासाप्रमाणे कळसच झाला.

शरच्चंद्र मुक्तिबोध कोणाशीहि बोलतांना—वाद घालतांना आपला तोल कधी सुद्धां देत नाहीत. निराधार तर ते कधीच बोलत नाहीत. शांतपणे ऐकण्याची व ऐकवण्याची शक्ति त्यांच्यांत भरपूर आहे. आपलें विधान पटवून देतांना ते तसूभरहि मागे हटत नाहीत. पण दुसऱ्यांचें म्हणणें पटण्यासारखें असेल तर पटत नसल्याचा दुराग्रहहि ते धरीत नाहीत. स्पष्टवक्तेपणा हा त्यांचा दुसरा प्रमुख गुण आहे. ते स्वत: सहसा एखाद्या गोष्टीला वाचा फोडीत नाहीत. शक्य तोंवर त्यांची श्रोत्याची भूमिका असते. पण बोलायला लागले की मग एखाद्या गोष्टीची अशी कांही मीमांसा करतील की प्रतिस्पर्धी जागच्या जागीं गारद होईल. तसेच ते करारी आहेत. निश्चयाप्रमाणे कोणचीहि गोष्ट सिद्धीस नेण्यास ते तन्मयतेने झटत असतात. त्यावेळी कसल्याहि आपत्तीची ते मुळीच तमा बाळगत नाहीत.

समाजकारण, राजकारण, धर्मकारण व अर्थकारण यांचा मुक्तिबोधांनी सखोल अभ्यास केला आहे. व्यासंग व अनुभूति ह्या शक्तीवर त्यांची विचार पद्धति व कार्यपद्धति मूळ धरून असते. तात्विक विवेचनाचे वेळी त्यांची विशाल बुद्धिमत्ता व व्यापक दृष्टिकोण यांचा प्रत्यय येतो. एकदा 'मानवी धर्मांची शाश्वत मूल्यें' ह्या विषयावर मित्रमंडळीशी वाद घालतांना ते तळमळीने उद्गारले, 'आपण पाहातों किंवा वाचतो तें जग वेगळें आणि जें अनुभवतों व ज्या बहुसंख्य अशा खालच्या थराशी एकजीव होऊं पाहातों तें जग वेगळें. मानवी धर्मांचीं शाश्वत मूल्यें ह्या खालच्या थराच्या अंतराळांत दडलेलीं आहेत. तीं आपण कधी लक्षांत घेण्याचा प्रयत्न करतों काय ! आपली थोडी चैन असली, थोडा मानमरातब असला व थोडा पैसा हाताशी खेळत असला की त्या भूमिकेवरून मानवी धर्मांची नसेल ती कल्पना करून ह्या खालच्या जगाकडे केवळ उपकारी ह्या भावनेने

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पाहण्याच्या आपण बरेच प्रयत्न करतों. पण हें ह्या वर्गांची फसवणूक करण्यासारखें आहे. त्यांच्या जीवनाशी समरस होऊन, त्यांच्यांतील सत्य शोधून काढणें व त्याचप्रमाणे आपण कितपत वागतों, किंवा नाही याचा पडताळा आत्मपरीक्षणाने कितीसे लोक घेतात ? मानवी धर्माची शाश्वत मूल्यें ठरविण्याचा तसा अधिकार आपल्याला सहजासहजी प्राप्त होऊं शकत नाही, कल्पना मात्र काय ती करूं शकूं एवढेंच ! वर्गभेदातीत होऊन मानवी सृष्टींत सहृदयतापूर्वक जेव्हा आपण सम्यक्पणें संशोधन करूं तेव्हा कुठे मानवी धर्माच्या शाश्वत मूल्यांचा थांग आपल्याला लागूं शकेल, एरवी नाही. '

मुक्तिबोधांचें काव्य हें असल्याच वैचारिक बैठकीवर अधिष्ठित झालेलें आहे. त्यांच्या प्रत्येक काव्यांतला एकेक पापुद्रा उत्कटतेने भरलेला असतो. त्यांनी जें जग पाहिलें आणि अनुभवलें तें जग त्यांच्या काव्यांतून पूर्णपणे प्रकट झालें आहे. म्हणून अवघ्या एकतीस कवितांच्या संपत्तीवर ते महाराष्ट्राचे ख्यातनाम कवि म्हणून नांव लौकिकास चढले. ह्या एकतीस कवितांचा संग्रह आता नुकताच कुठे प्रसिद्ध झाला आहे. नवकाव्य म्हणजे काय व त्याचें खरें स्थान कुठे व कसें हें पाहावयाचें झाल्यास ' नवी मळवाट ' हा काव्यसंग्रह कुणीहि पडताळून पाहावा म्हणजे त्यांत कवीची प्रकृति, दृष्टि आणि शक्ति यांचा सहज थांग लागेल. अनुभूति, आत्मविश्वास आणि समष्टिसमरसता हे मुक्तिबोधांचे विशेष होत. ' गर्भांतल्या बाळाचें रुदन ', ' त्रिशंकूचें स्वप्न ', ' जीवाची प्रचंड फेक ', 'अंत आहे तसा आरंभ आहे', 'सूर्ययुग' इ. कवितांत समाजांतील विविध थरांत कोणतें चित्र कसें आहे याचें अतिशय हृदयस्पर्शी चित्रण ते करूं शकले याला कारण त्यांच्या मनाची वर वर्णिलेली घडणच होय !

एके सायंकाळी मी मुक्तिबोधांच्याकडे गेलों. आभाळ दगाळून गेलें होतें. ते फिरण्यास निघण्याच्या बेतांत असतील असा माझा कयास होता. ते एका कोपऱ्यांत मांडी घालून कांहीतरी लिहिण्यांत गर्क झाले होते. बाजूला शिगारेटची थोटकें पडलीं होतीं. मीं म्हटलें, ' कायहो एवढा उकाडा आहे आणि तुम्ही स्वतःला कोंडून घेऊन इतके परिश्रम ते कसले घेत आहांत ? ' नेहमीच्याच आपुलकीने ते म्हणाले, ' अरेवा ! फार छान झालं तुम्ही आलात. या, असे या '

'अरे बाबा, ही काय बसायची वेळ आहे ! चला, बाहेर फिरायला चला.' मी आग्रहाने म्हणालों. ते थोडें खिन्नपणे हंसले व म्हणाले,

" फिरायला ! छे हो ! आता कुठं मी माझ्या जगांत उतरलों आहे. अन् म्हणता फिरायला चला. नाही बाबा नाही क्षमा करा. " माझी नजर बाजूला पडलेल्या ढिगाऱ्याकडे गेली. लिहिलेलें पंधरा सोळा कागद मजकडे टवकारून पाहात होते. मी उत्सुकतेने विचारलें, ' कसला हा प्रपंच ? ' तेव्हा ते उल्हासाने म्हणाले, ' आहे का थोडा वेळ माझा प्रपंच बघायला ? ' मी होकारार्थी मान हलविली. त्यांनी अस्ताव्यस्त पडलेले कागद गोळा केले आणि ' अंत आहे तसा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आरंभ आहे ' ह्या आपल्या काव्याची एकेक ओळ वाचून ते मला अर्थ समजावून सांगूं लागले. त्यावेळी कुठे त्यांचे डोळे पाणावले जात असत, कुठे त्यांच्या गंभीर मुद्रेवर उद्विग्नतेची छटा उमटत असे, कुठे गरम श्वास वेग घरीत असत; कुठे त्यांचा आवाज कंप पावून चेहरा कठोर रूप धारण करीत असे. तब्बल चार तासानंतर त्यांचें काव्यवाचन व निरूपण संपल्यावर ते म्हणाले, "बघितलं माझं जग !"

काव्यांत संपूर्ण अंतःकरण ओतून देणारा आणि वस्तुस्थितीचें मूर्तिमंत चित्र आत्मीयतेने रेखाटणारा कवी कसा असतो याचें प्रात्यक्षिक मी अनुभवीत होतों. असे अनेक सुयोग मला प्राप्त झाले.

मराठी भाषेवर मुक्तिबोधांचें जसें प्रभुत्व आहे तसें तें हिंदीभाषेवरहि आहे. त्यांच्या लेखनाचा प्रारंभ प्रथम हिंदी लेखनानेच झाला. त्यामुळे त्यांच्या मराठी वाङ्मयांत अधून मधून हिंदीचे ठसे उमटलेले आढळतात. त्यांनी हिंदींत विपूल लेखन केलें आहे. विशेषतः उत्कृष्ट हिंदी लघुकथालेखक म्हणून त्यांनी बराच लौकिक प्राप्त केला आहे. 'अंधकार और प्रकाश', 'टूटी आरसी', 'रेगीस्तान की कहानियाँ', 'नीरू', 'आवारे पंछी', 'संधि', 'कीरत', 'गांठ', 'अविश्वासका विश्वास', 'वह गरीब कुचला हुआ', 'दिलशाद' आदि उच्च प्रतीच्या अनेक हिंदीकथा त्यांनी लिहिल्या असून श्रेष्ठ प्रतीचें हिंदीकाव्यहि निर्माण केलें आहे. शिवाय विचारपरिप्लुत असे कितीतरी स्फुटलेख त्यांनी लिहीले आहेत. 'काव्य आणि सौंदर्यवाद', 'गडकरी', 'आधुनिक कलावंतांचें द्वंद्व', 'वास्तववाद आणि रोमान्स', 'नवकाव्य' इत्यादि लेख त्यांच्या अभ्यासू वृत्तीचे नमुने आहेत. त्यांची लिहिण्याची घाटणी कौशल्यपूर्ण, भाषा किंचित्शी जड पण प्रभावी आणि विचार भरीव असतात. तत्वविवेचनावर ते अधिक भर देतात पण कोणतेंहि कथन निःसंदिग्ध आणि निष्कर्षपूर्ण असल्याने जिज्ञासू वाचक त्यांच्या लिखाणांत रमतो. त्यांचें थोर व्यक्तित्व हें जसें त्यांच्या आचारविचारांच्या शालीनतेंतून प्रगट होतें तद्वत्च तें त्यांच्या साहित्यांतूनहि स्वच्छपणे उमटलेलें असतें.

मुक्तिबोध हे भाविक, अंधश्रद्धाळू किंवा दैववादी नाहीत. ते ध्येयवादी व प्रयत्नवादी आहेत. कोणतीहि गोष्ट साध्य करण्याची ते दुर्दम्य आशा बाळगतात. कधीं कधीं ते विचारांत इतके गढून जातात कीं सिगारेटचें जळतें थोटुक ते सहज खिशांतच कोंबतात अन् मग छातीला चटका बसल्यावर कुठे सावध होतात. असल्याच विचारी प्रकृतीमुळे ते थोडे विसराळूहि झाले आहेत. एकदा त्यांना नभोवाणी केन्द्रावर काव्यवाचनाला जायचें होतें. 'घरून येतांना काव्य-संग्रह घेऊन या बरं का ! नाहीतर विसराल.' एका केन्द्राधिकाऱ्याने त्यांचा स्वभाव जाणून त्यांना बजावून सांगितलें. 'मी कां इतका विसराळू आहे होय !' असें म्हणून ते घरीं आले. संग्रह काढून टेबलावर ठेवला. अंगांत कोट चढवला आणि ते डुलतडालत केन्द्रावर आले. 'हं आणा पाहूं संग्रह.' अधिकाऱ्याने पृच्छा

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

केली. तेव्हा हे महाराज म्हणतात, 'कसला संग्रह?' त्याच्यावर अधिकारी म्हणतात, 'अहो आज काव्यवाचन आहे ना! अन् मी तुम्हांला संग्रह घेऊन यायला नव्हतं का सांगितलं?' तेव्हा कुठे हे भानावर येऊन म्हणतात, 'अरेच्या मी तर संग्रह घेतला होता. मग तो कुठं बरं राहिला? विसरलों की काय घरींच!' असेंच एकदा ते ऑफिसमधून पायींच घरीं जात होते. मी त्यांना म्हणालों, 'कायहो, आज पायींच का! सायकल नाही आणली वाटतं!' ते क्षणभर जागीच घुटमळले अन् स्वतःशीच पुटपुटले, 'सायकल, सायकल ना! हां हां, टीक आहे. सायकल तर मी स्टँडवरच विसरलों' आणि ते स्टँडकडे परतले. त्याचप्रमाणे ते गाडीची वेळ साधतील असें सहसा कधी घडायचें नाही. एकदा तर ते लागोपाठ चार दिवस स्टेशनवर गेले व आगगाडीनें सुटतांना धरलेला वेग पाहून निमूट परत आले. विचारांच्या तंद्रींत त्यांचा विसराळुपणा त्यांना पुष्कळांकडून कौतुक व प्रेम मिळवून देतो एवढें मात्र खरें. कार्याच्या दृष्टीने किंवा कांही विचारांना घेऊन पुढे सरकणारीं माणसें त्यांना आढळलीं तर ते त्यांच्यांत रमून जातात. मात्र त्यांना पोशाखी व आपण कुणी और आहोंत असें दाखविणाऱ्यांशीं ते थोडे फटकून वागतात. वरवरच्या गोष्टींची व वरपांगी सहानुभूतीची त्यांना फार चीड येते. ते जातिभेदाचे कट्टर द्वेष्टे व समानतेचे कट्टर पुरस्कर्ते आहेत. प्रचलित रूढिधर्म त्यांना नको. मानवी धर्मानें प्रेरित होऊन एकमेकांनी, एकमेकांना आधार द्यावा व आपल्या बरोबरीनें इतरांना मानानें वागविण्यांत यावें अशी त्यांची वृत्ति आहे.

याप्रमाणे, मुक्तिबोध हे अंतर्मुख प्रकृतीचे कवि, तर्कशुद्ध विचारसरणीचे तत्वज्ञ, वास्तवदर्शी दृश्यें रंगविणारे कुशल कथाकार आणि बहुरूपी कलावंत आहेत. काव्य आणि तत्व यांचा सुंदर मेळ त्यांचे ठायीं बसला आहे. ते प्रथम दान देतील अन् नंतर आपला संसार बघतील. ते प्रथम दुसऱ्याचे अश्रु पुसतील अन् मग स्वतःला सावरतील—इतक्या उदात्त सोज्वल अन् मंगल प्रवृतीचे, क्षणाक्षणाला आपल्या हातून विशेष घडेल याचा विचार करणारे व तसें आचरण ठेवणारे 'माणूस' आहेत.

आयुष्य निष्कलंक राखून व माणुसकीचे व्यवहार पाळून दीन दुबळ्यांच्या उन्नतीसाठी ज्याचा आत्मा सारखा तळमळत असतो व जी जीवनांत कांही विशेष घडवूं पाहते अशा तत्प्रवृत्त व्यक्तींपैकी मुक्तिबोध हे एक असून त्यांच्या अखंड सहवासासाठी माझें मन जें ओढ घेत असतें यांत अनुचित कांहीच नाही.

विदर्भ साहित्य संघाचे सभासद होऊन साहित्याची रुचि वाढवा.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

बालपणीचा ब्रह्मानन्द

(जाति—चंद्रकान्त)

बालपणीचा काल मजेचा ब्रह्मानन्दाचा
सांग गड्या तो आठवतो का ? स्वैर जीवनाचा !
गतकालाच्या स्मृती न बुजल्या ताज्या अद्यापि
तोंच फडकल्या धवल पताका जीव सर्व व्यापी.
बाल कवींचें बोल गोड ते, नाही काळ वेळ
सांजसकाळीं खेळत होतों गोपांचा खेळ !
मिष्टान्नाहुनि अधिक माधुरी कंदफळांमाजी
चाखित होतों ब्रह्मानन्दी लाखेची भाजी.
कधि कासारीं, कधि माळावरि यथेच्छ विहरावें
कीं, त्या पुढती काळानेहि खुशाल नत व्हावें !
कधि राघूला, कधि मैनेला रोज पाखर्यांना
भुरकुन् द्यावें सोडुन गगनी रुचिर पाखरांना !
गिरक्या घेता, सर सर चढता मावे ना मोद
असा अजब हा खेळ जादुचा व्यासंगी छन्द !
अनन्त व्योमी अन्त गाठण्या विहंग पथ लक्षी
लक्ष लक्षिता भूखंडावर भ्रमतो "हा पक्षी".
ग्रीष्मऋतूच्या ऐन दुपारी आंब्याच्या कैऱ्या
देउन घेउन माकडलीला स्वये अनुसराव्या
धर्मांचा हा, नच रूढीचा, निर्मल प्रेमाचा !
उदय जाहला अंतर्यामी तेव्हा समतेचा !
नव्या मनूचा नव बालांचा हा ब्रह्मानन्द
बघता कां नच ब्रह्मानन्दी तोषित गोविंद !
किती वानावें, किति वर्तावें ! बालानन्दाच्या
एक, दोन नच असंख्य लीला त्या नानापरिच्या.
हां हां म्हणता ते दिन गेले; गेले लाखाचे
आठवता तो काल मजेचा मनी मोर नाचे.
मोठे झालें, बंधन पडलें गेला तो काल
स्थावर जंगम पसाऱ्यास कां येइल तें मोल !
स्वैरपणाचा स्वातंत्र्याचा त्रिलोक बघण्याचा !
येईल कां कधि काल पुन्हा तो ब्रह्मानन्दाचा !

—तु. ना. काटकर,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

उपाध्याय सासरी पळाला

इंदुमती शेवडे

★

हातांत जाडजूड पिशवी नि वह्यांचा गठ्ठा घेऊन फाटकांतून आंत शिरतांना सरूताईंना मीं पाहिलं, नि एकाएकी एक कल्पना झपाट्यानं माझ्या मनांत शिरली अन् मी काय करीत आहे याचं संपूर्ण भान राहण्यापूर्वीच मी सरूताईंच्या खोलीकडे जाण्यासाठी निघालों.

आमची लांबलचक चाळ सायंकालीन हालचालींनी गजबजून निघाली होती. मुलांचा आवारांतील धुळींत विटीदांडूचा खेळ रंगांत आला होता. 'मंडळी' ऑफिसचीं कामें उरकून परतत होती. कडेवर तान्हीं मुलं घेऊन कांही बायका दारांत उभ्या होत्या तर कांही 'नळ आला' म्हणून तिकडे निघाल्या होत्या. कांही शाळेच्या पोरी माना व झिंपटें वेळावीत उगीचच कांही तरी करतांना दिसत होत्या.

पण माझें मात्र रोजप्रमाणे ह्या कशाकडेहि लक्ष नव्हतं. मी थेट चाळींतील चार घरें टाकून, सरूताईंच्या खोलीशी जाऊन थडकतों, तों सरूताई खोलींत अदृश्य झाल्या होत्या.

सरूताई म्हणजे शुद्ध मास्तरीणकाकू दिसत. वय चाळिशीच्या जवळपास असावं. त्यांनी अखंड कौमार्याची शपथ घेतली असून, शिक्षणकार्यासाठी स्वत:ला वाहून टाकलं होतं—अशी सामान्यत: समजूत होती. पण त्यांच्या तोंडाकडे पाहून मात्र—!

कारण, सरूताईंच्या गालाचे द्रोण झाले होते. डोळे उन्हाळ्यांत वाळून खोल गेलेल्या डबक्याप्रमाणे, गळ्याचीं हाडें घराच्या उंबरठ्यासारखीं उठावदार झालेलीं, नि लसणाच्या कळ्यांप्रमाणे लांब लांब दांत...असा त्यांचा भकास चेहरा दिसे. अलीकडे त्यांच्या कानाशिळावर दोन्ही बाजूस रुपेरी केसांची कडहि चमकूं लागली होती.

सरूताईंच्या दाराशी मी पोचतों, तोंच आंतून स्टोव्ह पेटल्याचा 'भर्रर्र!' आवाज आला, सरूताईंनी आधण ठेवलेलें मीं ऐकलें नि दारांतूनच हाक मारली—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" काय सरूताई ! "

" कोण ! " आपली लांब रोडावलेली मान बाहेर काढीत त्या म्हणाल्या.

" मी आहे......खाडे....म्हटलं, आहेत कां घरांत ! "

" हो, हो, या बसा...ही नुक्तीच आलें बघा शाळेतून."

" काय आत्तां !..." अज्ञानाचं सोंग घेत मी खुर्ची ओढली; "म्हणजे बराच उशीर झालाय् तुम्हांला यायला !"

" छे, छे, माझी रोजचीच ठरलेली वेळा आहे हो. अगदी नियमित सवापांचाला शाळेतून निघून साडेपांचच्या ठोक्याला माझं पाऊल फाटकांत पडतं. अगदी दोन मिनिटंसुद्धा इकडे कां तिकडे व्हायचीं नाहीत बघा. साडेपांच म्हणजे साडेपांच ! घड्याळाच्या कांट्यावरहुकुम कामं करायची संवय माणसाला जडल्याशिवाय जीवनांत शिस्त कशी ती निर्माण होतच नाही..." सरूताईची प्रवचनाची आवड माझ्या परिचयाची होती.

" पण समजा कांही कमी अधिक कामंच निघालीं....किंवा कुणी वाटेंतच भेटलं तर ! "

" तर मी त्याला सरळ शाळेंत किंवा घरीं बोलावतें. शिवाय मला रस्त्यावर बोलत उभं राहणं अगदी गैरशिस्त वाटतं नि कामाशिवाय अवांतर ओळखी हव्या कशाला ! आपलं शाळेच्या आवारांतून बाहेर पडलं की खाली मान घालून चाळीच्या आवारापर्यंत सरळ घरीं यायचं, झालं..."

" खाली मान घालून....! " चेहऱ्यावर कांही गूढ भाव आणीत हळूंच पुटपुटत मी म्हणालों: "अस्सं ! म्हणूनच रोजच्या कामाव्यतिरिक्त एरवीं दिसणारे चेहरे तुम्हांला परिचित नाहीत."

" काय ! कुठले चेहरे ! "

" कांही नाही...असंच आपलं म्हणत होतों मी..."

" तरी पण ! "

" अहो, मी स्वतःशीच आश्चर्य करीत होतों...की ध्येयवेडीं माणसं तुम्ही ! एक मी सोडून चाळींतील इतर चेहरे तुम्हांला ठाऊक तरी असतील की नाही कोण जाणे ! "

" अं–! नाही एवढे...! बरं. मग ! "

" मग काय ! मग बोलणंच खुंटलं..."

" म्हणजे ! कांही बोलायचं होतं तुम्हांला ! "

" त्यासाठीच तर आलों होतों मी... पण काय ! सरूताई, अहो जिथं चेहरेच परिचित नाहीत....तिथं त्या बिचाऱ्यांच्या भावना तर आणखी फर्लांगभर दूर राहिल्या..."

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" पण कुणाच्या भावना ? " सरूताईच्या गढूळ डोळ्यांत थोडीशी चमक दिसल्याचा मला भास झाला.

" समजा कुणी असलाच एकादा...आपल्या चाळींत कुणी कांही वाटून घेणारा तुमच्याविषयी...तर ? "

" पण मी म्हणत्यें की, माझ्यांत असं काय आहे एवढी माझ्याविषयी आदराची भावना बाळगायला ! आणखी हवा चहा अर्धा कप !—"

" नको, छान झाला हं चहा. पण सरूताई, काय म्हणत होतों मी हं— केवळ आदराचीच नव्हे..."

" केवळ आदराचीच नव्हे ? तर मग दुसरी...म्हणजे ! म्हणतां काय तुम्ही, खाडे ! "

" अगदी खरं सांगतोंय मी सरूताई ! कां ! आश्चर्य वाटलं तुम्हांला ? "

" अर्थात् ! नाहीतर काय ! कांही तरीच सांगतांहांत झालं ! मला कल्पना सुद्धा करवत नाही पण तुम्ही अगदी गंभीर होऊन..."

" अहो, सत्य कल्पनेपेक्षांहि अधिक कल्पक असतें. आज नाही, उद्यां पटेल तुम्हांला हें..." एवढं बोलून सरूताईना त्याच उत्कंठित स्थितींत सोडून मी काढता पाय घेतला.

× × ×

सरूताईकडून निघालों, तों चार खोल्या टाकून मी सरळ मारूतरावांच्या खोलींत शिरलों.

मारुतराव म्हणजे एक वल्ली होती. लहानपणापासून गृहस्थाला नाटकाचें वेड. जेमतेम कॉलेजांत पाउल टाकलें असेल नसेल, तोंच रंगभूमीवर रंग उधळण्यासाठी सारें आयुष्य बेरंग केलें पठ्याजीनें. शिक्षण सोडलें, घरदार सोडलें, नि कुठल्याशा एका नाटक कंपनींत नोकरी धरली. त्यांत कांही दिवस नुसत्या चिल्लर भूमिकांवर तलफ भागवली, कारण अभिनय होता कुणाजवळ ! हळूहळू रंगभूमी सुटली. पण दारूप्रमाणे नाट्याचाहि नशा असतोना ! रंगभूमी एकदम सुटेना. अखेर नाटकांतील पात्रांचे चेहरे रंगवायचें काम हातीं घेतलें नि त्याबरोबरच नाटकाला लागणारी सारी रंगभूमीवरील सामग्री किरायाने देण्याचें एक दुकानहि सुरू केलें. शहरांत वर्षाकांठी डझनभर तरी नाटकें होऊनच जात, नि मारूतरावांचा चरितार्थ चालून जाई....प्रत्यक्ष रंगभूमी सुटली होती... परंतु नाट्याचा संबंध कायम होता...नि जीवनांतहि नाट्य मरून होतें.

मी मारुतरावांकडे घरांत शिरलों, तों ते न्हाणीघरांत असल्याचा आवाज आला. मी तिकडे गेलों नि पाहतों तो मारुतराव धोतर धूत होते.

" कां ! आज आपल्याच हातांनी चाललंय काम ? "

" हं. मोलकरीण संपावर गेली..." धोतराचा पिळा करीत मारुतराव म्हणाले, "नि दुसरं कोण आहे माझं करायला ! "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" तें अगदी तुमच्या हातांत आहे. तुम्ही दुसरं माणूस कां आणीत नाही स्वतःसाठी ? "

" साहेब, म्हणणं सोपं आहे, अन् तुमचं लग्न आटपलंय म्हणून तुम्ही हव्या तेवढ्या गोष्टी कराव्या. खरं म्हणजे, माझ्यासारख्याला बायको म्हणजे साखरेइतकी दुर्मिळ झाली आहे. पण साखरेप्रमाणेच बायकोहि ब्लॅक मार्केटमधून मिळवायची नाही हा माझा बाणा आहे. राजरोस एकादी सांगून आली.... तरच हवी. पण......."

पण काय ! तुम्ही अगदीच बुझादिल बुवा ! माणसाला नेहमी डोळे उघडून चालावं लागतं हें मी नेहमी म्हणतों तेंच खरं."

" नुसते उघडून ! डोळे अगदी सताड उघडे ठेऊन चाललोंय मी आजपर्यंत, खाडे...परंतु स्त्रियांचा नि माझा योगायोग नाही..."

" कां बुवा ? "

" नाहीतर काय ! प्रथम आईबापांनी नांवच मुळी 'मारुतराव' ठेवलं, एका ब्रह्मचाऱ्याचं. त्यानंतर ऐन जवानींत कॉलेजांतल्या पोरी सोडून रंगभूमीवर गेलों. पण मी जोंपर्यंत रंगभूमीवर काम केलं, तोंपर्यंत स्त्री-नटी रंगभूमीवर येतच नव्हती नि अखेर रंगभूमी सोडून पात्रांची तोंडं रंगवायचा धंदा काढला, तर स्त्रीपात्रं आपापली तोंडं रंगवून घ्यायाला लागलीं. म्हणजे तोहि संबंध नाहीच नि लग्न करीन म्हणून आज म्हणतोय, तर 'नाटक्या' म्हणून कुणी ढुंकूनसुद्धा माझ्याकडे त्या दृष्टीनं पहात नाही...."

" नाही पटत बुवा आपल्याला हें. अशा गोष्टींना ती दृष्टीच लागते म्हणतो ना. नाहीतर, कुणीआपल्याकडे ढुंकूनच काय......टक लावून पहात आहे......हें कळलं असतं तुम्हांला."

" काय ! माझ्याकडे ! उगीच चेष्टा करताहांत..."

" बरं तर राहिलं माझं बोलणं..."

" पण खरं सांगा ! खाडे, शक्य तरी आहे कां हें ? "

" खोटं कशाला बोलूं मी ! "

" पण...पण मग इतके दिवस बोललां नाहीत तुम्ही ? नि...मलाहि कसं कळलं नाही तें ? "

" म्हणतों ना तें कळायला दृष्टि लागते म्हणून ?

" पण खरंच खाडे, खरंच कुणी आहे का अशी ?...माझ्याविषयी एवढं वाटून घेणारी ? "

" अहो, सांगतों काय ? एका वर्षापासून झुरतेय बिचारी तुमच्यासाठी..."

" काय ! एका वर्षापासून ! " मारुतराव अगदी स्वतःशीच तें वाक्य पुन्हा पुटपुटले.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" थांबा, तुम्हांला थोडा चिवडा देतों सकाळचा. पण असं तुम्ही मोघम बोलूं नका बुवा ! कोण ? कोण असेल अशी ! "

" पण तुम्हांला ती आवडेल का नाही... कोण जाणे "

" म्हणजे ? मला ? नि आवडणार नाही ? "

" म्हणजे...त्याचं अमंय मारुतराव, मी तुम्हांला ही गोष्ट वर्षापासून सांगितली नाही...कारण मी कचरत होतों...नि तीहि कचरतेय. घरतेय बिचारी नुसती..." '

" पण कारण सांगाल की नाही..."

" अं:,...म्हणजे अस...की ती एकाहि नाटकांतल्या नायिकेप्रमाणे सुंदर नाही..."

" हात्तिच्या ! अन् आम्ही कोण एवढे एकादे नायक लागून गेलों आहोत अगदी ? "

" म्हणजे दिसायला कशीहि असली...तरी तुम्ही मारे गुण रुपापेक्षा प्रेमालाच देणार ना ? "

" अहो, तिचं एवढं प्रेम असल्यावर कोण विरघळणार नाही ? कोण आहे ती...खाडे ? "

" आपल्या पलीकडच्या खोलींतली...ती सरूताई भावे."

" काय ? ती सरूताई मास्तरीण ? सरू ? "

मारुतरावांचा तो आश्चर्याचा उद्गार पसंतीचा होता की नापसंतीचा कोण जाणे !

× × ×

दुसरे दिवशी सकाळी साडेआठपर्यंत मारुतरावांच्या खोलीचें दारसुद्धा उघडलें नव्हतें. अगदी पहाटेसच त्यांच्या खोलींतून रोज ऐकूं येणाऱ्या "एक दोन....तीन...चार..." या त्यांच्या दंडबैठकीच्या अंकमोजणी ऐवजी, पावणे नऊला त्यांच्या जांभयांचा आवाज मला ऐकूं आला. एकूण स्वारी साखर झोंपेतून नि मधुरस्वप्नांतून नुकतीच जागी होऊन आठवणी उगाळीत अजून लोळत होती म्हणायची. अंमळशाने त्यांनी दाराची कडी काढली. अर्ध्यातासानंतर मी एकदा अगदी मुकाट्यानं त्यांच्या दारावरून एक फेरी मारून आलों. एक झकसा ठेवणीचा कोट घालून ते गुणगुणत आरशासमोर भांग काढीत उभे होते. आज चालतांना जणूं काय त्यांची पावलें अधरच पडत होतीं. कांही वेळाने बाहेर येऊन त्यांनी सरूताईच्या खोलीकडे सहज एकदोन घुटमळते कटाक्ष टाकले...नि ते हळूहळू घराबाहेर पडले.

पण सारी सकाळ निघून गेली, सरूताईकडून कसलेंहि प्रत्युत्तर मला मिळालें नव्हतें. माझा कालचा येवढा मोठा डोस त्या पचवूं शकतील इतकी श्रद्धा माझी त्यांच्या कौमार्यव्रतांवर नव्हती. साडेदहा वाजले. मला वाटलं, सरूताई

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शाळेला निघून गेल्या असतील. जेवण होतांच मीहि ऑफिससाठी म्हणून घराबाहेर पडलों. तोंच खोलीला कुलुप लावतांना सरूताई दिसल्या. मी मुद्दामच त्यांना न पाहिल्याचें ढोंग करून स्वतःला पुढे रेटलें. परंतु सरूताईंनीच हांक मारली—

" अहो, खाडे "

" काय ? "

" म्हटलं, थांबा जरा. दोघं बरोबरच जाऊं. आपली बरीचशी वाट एकच तर आहे. "

" बरंय, पण आज तुम्हांला निघायला उशीर झाला नाही कां ? "

" हो ना. पण आज निजूनच किती उशीरा उठलें मी ! "

" कां ? रात्रीं जागरण वगैरे केलं वाटतं ? "

" हं...... " सरूताई घुटमळल्या.

" तुमचं काय ? वह्या तपासत बसलां असाल...शिस्त म्हणजे शिस्त ! "

" छे हो, कालच्या तुमच्या बोलण्यावर विचार करीत होतें मी बराचसा. "

" कोणत्या ? " मी भोळेपणाने विचारलं.

" अहो तेंच, सत्य कल्पनेपेक्षा अधिक कल्पक असतं म्हणून. पण... खाडे, कालचं तें विधान तुम्ही सहजच केलं कां एकाद्या प्रत्यक्ष उदाहरणावरून ? "

" प्रत्यक्ष उदाहरणाशिवाय नुसती विधानं करीत नसतों मी. तुमच्याप्रमाणे माझीहि कांही तत्वें आहेत जीवनाचीं ! "

" म्हणजे ? खरंच कुणी आहे असा ? "

" तर काय ! "

" अगबाई ! पण...पण तो आहे तरी कोण ? "

" आहे बिचारा एक दुर्दैवी जीव...किती महिने लोटले असतील त्यानं मला हें गुपित सांगून...! पण त्यावेळी त्याला ठाऊक नव्हतं की तुम्ही लग्नाच्या विरुद्ध अहांत व एकाद्या ध्येयासाठी जीवन खर्च करणार अहांत म्हणून. "

" पण कुणी......कुणी सांगितलं त्याला हें सारं ? काय लोक तरी बाई—! "

" लोक कशाला, मी सांगितलं बिचाऱ्या त्या दुर्दैवी जीवाला. माझ्याजवळ तुम्हीच कितीदां तरी बोललां असाल असं ! "

" खरं आहे. पण माणसाचीं मतं काळ बदलवतो, खाडे. "

" म्हणजे ? एकूण आतां तुम्ही लग्नाचा विचार... "

" हो. पण आधी नांव तर सांगाल कां नाही त्याचं ? "

" अहो...ते आपले ते...मा...रो...ती...राव "

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

" कोण ? तो नाटकी मारुतराव ? " सरूताई एकदम थबकल्या.

" म्हणूनच मी सांगायला भीत होतों. बिचारे नाटकांत पडले कलेसाठी, ध्येयासाठी नि जन्मासाठी बरबाद झालंय त्यांचं नांव. सरूताई, खरं सांगतों; अगदी निर्मळ पाण्यासारखा माणूस आहे हो ! नि हृदयाचा तरी किती हळवा. ! ...किती दिवसापूर्वीची गोष्ट आहे...ज्यावेळी त्यांनी आपल्या भावना माझ्याजवळ बोलून दाखवल्या त्यावेळीं त्यांचा आवाज अगदी दाटून आला होता."

सरूताई मुकाट्याने ऐकत होत्या. तेवढ्यांत त्यांची शाळा आली. त्या आंत जाऊं लागल्या. पण त्यांना काय वाटलें, कोणजाणे। क्षणभर थबकून मला एकदम म्हणाल्या :

" मला एकच सांगा, खोडे ! अगदी खरीखुरी भावना आहे त्यांची ? "

" ...मग सांगतोय काय मी ? अगदीं मनापासून. "

× × ×

आणि आता माझी खोली !

अगदी सुरुवातीला, सरूताई माझ्याकडे कांहीतरी निमित्त काढून येत व उगीचच तासन्तास बोलत बसत. सरूताईचा आवाज ऐकला की मारुतराव हळूच मुकाट्याने आंत पाऊल टाकीत. प्रथम कशाच्या तरी निमित्ताने...नि नंतर उघड सरूताईच्याच ! प्रथम चोरून बघणें, नंतर मधून मधून उघड बघणें, नि पुढे तर एकमेकांवर अगदी नजर खिळून राहाणें. अखेर मी एकादिवशीं ऑफिसांतून किंचित उशीरा घरीं येऊन पाहतों तों त्या प्रेमभूमीचें स्थलांतर मारुतरावांच्या खोलींत झालेलें मला आढळलें. मला फार दिवस वाट पहावी लागली नाही. एकदिवस सकाळीसच मारुतरावांनी एक कागद हंसत माझ्या हातीं दिला. मी उघडून पाहतों तों त्यांच्या लग्नाची पत्रिका !

× × ×

त्यांचं लग्न उरकलं, पण माझा जीव मात्र निर्धास्त झाला नव्हता.

तसे सहा महिने अगदी सुरळीत निघून गेले. मी सारं विसरायलाही आलों होतों...तोंच त्या रात्री एकाएकी शेजारच्या मारुतरावांच्या खोलीतून मोठमोठ्याने बोलणें ऐकूं येऊं लागलें. मारुतराव व सरूताई होतीं तीं.

रात्रीचे अकरा वाजले असतील. सारी चाळ जवळपास पेंगुळलीच होती ; मीच तेवढा ठणठण दिवा जाळीत वाचत पडलों होतों. पण शेजारचें भांडण सुरूं होतांच...कोण जाणें कां, मी पटकन् दिवा मालवला... नि गुपचीप बिछान्यावर पडून ऐकत राहिलों...

" खरंच बाई, कंटाळलें अगदी !...एकावेळी वाटतं...कुठून पडलें या संसाराच्या जंजाळांत ? "

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'तूं पडलीस...नि मला पाडलंस आपल्याबरोबर...'

'मीं कशाला पाडूं तुम्हांला? तुम्हीच पडलां आधीं माझ्या प्रेमांत! नी म्हणून मला पडावं लागलं या तुमच्या फंदांत...'

'काय? मी पडलों तुझ्या प्रेमांत?'

'हो हो! इतकंच नव्हे...तर कित्येक दिवस झुरत होतांत माझ्यासाठी!'

'काय! मी झुरत होतों! कीं तूं? अग, तुला झालंय तरी काय! किती खोटं बोलतेस तूं!"

'काय! मी खोटं बोलतें, मी सरू खोटं बोलतें!'

'हो, अगदी सपशेल खोटं! तूंच नाही कां माझ्याकडे वर्षभर डोळे लावून बसलीस?'

'कुणी सांगितलं तुम्हांला हें!' सरूताई.

'कुणी काय? त्या खाडेची साक्ष आहे याला!'

माझं नांव! भीतीनं मी अगदी गारठून गेलों. तों माझ्या कानांवर एकदम शद्ब येऊन आदळले—

'काय खाडेची साक्ष!... आणि त्यानंच तुमचं माझ्यावर खूप प्रेम आहे म्हणून सांगितलं मला!'

'म्हणजे?'

'खोटंबिटं बोलला की काय मेला? चांगलाच आगलाव्या दिसतो...'

'अग, आगलाव्या काय' लग्नलाव्या तरी म्हण...लग्न लावलं त्यानं आपलं....'

'आतांच्या आतां जाऊन विचारतें मेल्याला मी याचा जाब.'

सरूताईच्या या वाक्यासरशीं मी अगदी मेल्यासारखा चिपाड झालों. माझ्या अंगाला दरदरून घाम सुटला...प्रत्येक क्षणाला सरूताईची थाप दारावर पडेल म्हणून मी कान देऊन ऐकूं लागलों. तेवढ्यांत...

'अग, आतां कुठं जातेस रात्रीं! अन् आतां फायदा काय? उलट, रात्री हा सारा प्रकार ऐकून सारी चाळ जागी व्हायची....आपल्या लग्नाचा तमाशा'

मारूतरावांचं म्हणणं त्यावेळीं सरूताईनीं ऐकलं असावं. कांही क्षणानंतर समेटहि झाला होता. थोड्यावेळानंतर त्यांची कुजबुज ऐकूं येऊं लागली!

मी दुसऱ्या दिवशी भल्या पहांटेस उठलों, गुपचुप वळकटी बांधली व सकाळी चाळींतले चाळे सुरू होण्यापूर्वीच माहेरी गेलेल्या बायकोला आणण्याच्या इराद्याने मीं घरांतून स्टेशनकडे पोबारा केला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सो ब त

☆

आहे उजळलेली ही लांब लांब वळणें घेत जाणारी
पाऊलवाट
कृश चंद्रिकेच्या क्षयी किरणांनी !
नेई मला माझ्या प्रेमापासून दूर, दूर आतां;
अजूनहि निस्तब्ध, निर्मम
करवंदीच्या जाळ्या ह्या···वेली नी ही झुडुपें;
क्षिती न त्यांना करपल्या हृदयाची मुळी
कढत आंसू ना गाळतात एक
न बोलती एक सहानुभूतीचा प्रेमळ शब्दहि···
वारा पडे, कसा तोहि वाढवी खिन्नताच···
क्षीण तेजाच्या चांदण्या न ह्या
परी भग्नाशाच्या आशांची शकलें !
कां न फूत्कारती भुजंग ऐसा भयाणवेळी ?
विटले तेहि माझ्या दुःश्वास···
न सळसळतीं पानें; न उडे पाचोळा !···मजशी
कोण सहभागी ?
मी, शरीर, खिन्नता—चाललों—
—तिघे एकोप्याने···सोबत एकमेकांस आमुची···
आहे उजळलेली ही लांब लांब वळणें घेत जाणारी
पाऊलवाट
कृश चंद्रिकेच्या क्षयी किरणांनी !

—वसंत मोहरील

ठाकूर आणि कंपनी लिमिटेडची
महत्त्वाचीं प्रकाशनें
१. फुलांची ओंजळ ('बी' कवींचा काव्यसंग्रह)
२ पाकिस्तानी प्रवृत्तीचा प्रतिकार (आचार्य दादा धर्माधिकारी)
☆ या पुस्तकावाचून तुमचा ग्रंथसंग्रह उणा राहील ☆

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

निसर्ग फूल आणि सुवर्ण फूल

उद्यानीं करूनी विहार श्रमल्या वीरांगना दोन त्या,
विश्रांतीस्तव भूवरीच पडल्या, तो होति निद्रिस्त त्या.
त्यांचा केशकलाप सुंदर दिसे, भूमीवरी लोळत
काळे शार सुदीर्घ सर्प दिसले, मोदें जणूं खेळत ॥१॥
सर्पाच्या दिसतो शिरीं मणि जसा, तैशींच तीं पुष्करें,
होतीं खोविलिं शीर्षि 'तीं प्रियकरें' अत्यंत प्रेमादरें
एकीच्या शिरिं एक पुष्प दिसलें, उत्फुल्ल नी गोजिरें,
वाटे अन्य सुवर्ण पुष्प असुनी, तें ना दिसें हासरें ॥२॥
बोले सुंदर पुष्प त्यांस बघुनी, "ना तूं दिसे गोजिरें
नाही रम्य स्वरूप सुंदर तसें, ना गोड ना गंध रे,
आहे पीत शरीर सर्व तव हें, शोभा न त्याला असे,
पुष्पाची रमणीयता न तुजला, त्याने तुला मी हंसे" ॥३॥
रागाने मग लाल होऊनि वदे, तें पीतसें फूल त्या,
"आयू फार नसे तुला जगतिं या, एके दिनीं तूं रहा
प्रातः कालिं उदीयमान रविच्या स्नेहास तूं जोडतो"
सूर्यास्तासह अस्त होइ 'तुमचा'! कां तूं मला बोलतो ॥४॥
"माझे पालक-मित्र थोर असले, ज्यांची सुकिर्ती जगीं
दीनांचा उपकारि नित्य असतो माझ्यामुळे ह्या जगीं,
कोणी ना विसरे जगांत मजला, मी कां जरी लोपलों,
शोधाया मज सर्व विश्व फिरतें, मी ना जरी हर्षलों ॥५॥
बोले रम्य निसर्ग फूल हंसरे, "राही, जरी दीन मी,
अल्पायू! जगतांत कार्य करि मी, किर्तीस संपादुनी,
माझें सुंदर रूप, गुण बघुनी, प्रेमी मनें हर्षतीं,
अल्पायू जरि सान बाल असलें, त्या का कुणी टाकिती? ॥६॥
"खाणींतून तुलाच काढुनि जगीं, हें रूप रे लाभलें,
नाही बाल, तरूण, वृद्ध असल्या, स्थित्यंतरा जाणिलें,
नाही जीव तुला सदा अमर तूं, जीवा परी घेतसे,
नाही हें अमरत्व या जगिं असें, कामीं कुणा येतसें! ॥७॥

× × ×

एखादी करुनी सुरेख प्रतिमा, गावी तिची गोडवी,
वाटे हर्ष मनास पाहुनि तिला दृष्टीस ती लोभवी
राही ती प्रतिमा जगिं अमर या! आनंद ना देतसे
चुंबायास्तव जाइ कोणिं जवळी, तृप्ति न त्याला असे. ॥८॥

—सौ. इन्दुमती गंधे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

योगेशचें मन

तारा पोतदार

★

नक्की माहीत असूनसुद्धा माणूस किती स्वतःची फसवणूक करून घेत असतो सतत ! आपल्यांत कांहीतरी विशेष आहे — आपले विचार सामान्य नाहीत—आपलें आयुष्य निराळें आहे—एक ना दोन किती तरी बाबतींत ह्या 'मी'पणा ला तो मर्मस्थलाच्या घावासारखा जपत असतो.

योगेशने कुठे तरी वांचलें "कन्सीट इज गॉडस् गिफ्ट टू लीट्ल मेन" आणि विचार करण्याच्या लागलेल्या सवयीमुळे दोन दिवस त्याच ओळीचा अर्थ अनर्थ करण्यांत घालविले. त्याला वाटे "आपल्याला कळतें आपण मूर्ख आहोंत. लोकांना कळत नाही म्हणून तेंच आपल्यापेक्षा......!" त्याला सॉक्रेटिसची आठवण झाली. पण हा अहंपणा सोडावयाचें ठरवलें ना ! मग हें काय ! आपली प्रौढी मिरवायची पडली सवय आपल्याला. अगदी बोलतां बोलतां सहज लोकांच्या ध्यानांत आपण केलेलें किंवा चुकून आपल्या हातून घडलेलें चांगलें कार्य अशा तऱ्हेने समोर मांडायचें की, त्यांनी समजून जावें आपण असाधारण आहातें."

अशा कित्येक स्वतःच्या दुर्गुणांची त्याला जाणीव होती. 'पण चांगलें व्हावेंसें वाटतें अेवढाच काय तो गुण आपला', तो म्हणायचा.

अेक वही केली त्याने. त्याच्यावर ठळक अक्षरांत लिहून ठेवलें "काय करू नये तें", आणि तारीखवार आज आपण अहंपणाला उत्तेजन देणारें काय केलें तें नमूद करणें सुरु केलें.

ता० ४-५-४७; आज "अमुक अमुक" संस्थेला भेट देण्यासाठी आले होते—कारण नसतांना आपण विनाकारण पुढेपुढे मिरवलों. खरें पहाता त्यांना काय आपली ओळख राहणार आणि 'कॅमेरामन' च्या समोर समोर तरी आपण का झालों इतकें ! पण ते फोटो कोण पाहणार ! आणि टॉलस्टॉयने कुठे तरी म्हटल्याप्रमाणे समजा शांती आणि प्रेमाचें वातावरण निर्माण करायचें असेल तर दुसऱ्यावर इतकें प्रेम करावें, जितकें आपलें स्वतःवर असतें. मोठ्या लोकांच्या मोठ्या गोष्टी. तें राहूं दे—सरळ हें की तें समोर समोर नाचणें अयोग्य होतें."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ता० ७-५-४७; किती जास्त बोललों आपण उगाचच्या उगाच आणि त्या 'बॅडमिंटनच्या चॅंपियनशिप' चा उल्लेख तरी कशाला केला होता?...... आपण चांपियन कसें झालों हें माहीत आहे आपल्याला. कुणी त्यावर्षी खेळणारें नव्हतें चांगलें व एका पार्टीनें वॉकओव्हर दिला. मग दोन 'मॅचेस' खेळून मिळविलेल्या चॅंपियनशिपचा गवगवा काय करायचा?

केवढी 'मी' ची थोरवी! अरेरे! आपली "वेल्स" च्या "क्लप् आव् बर्लिंग्टन" सारखी स्थिती होईल नक्की—"

ता० ८-५-४७; शेवटीं रोज दोन तास आपण काय केलें व काय करूं नये ह्यांतच खर्ची व्हायला लागले आणि रात्री लिहून काढावें व दिवसा त्याच चुका पुन्हा घडाव्या."

आणि त्याने डायरीचीं तेवढीं पानें चराचर फाडून टाकलीं, व ते तुकडे एका लिफाफ्यांत घालून टेवले. नेहमी मित्रांना सांगायचा तो की मीं हें असें केलें. कांही कौतुक करीत. कांही थट्टा करीत, तर कांही गप्प राहात. योगेशचें डायरी लिहिणें बंद झालें. कुणी वादविवादाकरता बोलवायला आलें तर "भाग घेत नाही असें ठरविलेंय" "कारण?" "तें सांगता येत नाही." पण विचारणारे बाहेर गेल्याबरोबर चटकन् कान दाराला लावून त्यांचा संवाद तो ऐकूं लागला— "चक्रम आहे झालं! नाहीतर भाग घेतला नसेल तरी पुढेपुढे मिरवील डिबेटच्या. बरें, बोलतो तरी काय?—नुकतींच वाचलेलीं एकदोन बुकें किंवा बातमी, चुटका नाहीतर कवितेच्या ओळी मारून मुटकून व्याख्यानांत आणावयाच्या. लोकांना वाटावें किती 'वेल रेड' आहे म्हणून. 'हम्बग' बेटा."

" अरे! पण इतका रागावू नकोस बाबा! तुझ्या आमंत्रणांत तरी किती कळकळीचा आग्रह होता. परवा त्या मिस् पांडेशी भांडलास आणि तिने नकार दिला..."

' हो! आणि हा पडला सेक्रेटरी. प्रसंग साजरा व्हावा म्हणून आणि मिस् पांडेला दिमाख दाखविता न यावा म्हणून वक्ते गोळा करायची ही धडपड.'

योगेश अस्वस्थ मनाने बिछान्यावर येऊन पडला. ' खरें म्हणत होतीं तीं मुलें! किती दिवस तरी आपण ज्याला त्याला ' डार्क नेस ॲट् नून ' या पुस्तकाचा डोस देत होतों. ऑर्थर कॉइस्लर म्हणजे जरा टफ समजला जाणारा लेखक. त्याचें "योगी" आणि 'कमीसार' कांही आपल्याने वाचून झालें नाही. तर त्याच्या ह्याच पुस्तकाचा उल्लेख जिकडे तिकडे करायचा. मासिकांत लेख दिला त्यांत तेंच. दोस्तांशी गप्पा त्यांत तेंच आणि भाषण, वादविवाद कुठेहि 'दुपारचा अंधार'च. '

योगेशची दिनचर्या बदलली. बहुतेक सार्वजनिक समारंभ तो टाळीत असे. शक्य तितकें एकटें राहायचें आणि झोपायचें; सायंकाळी कपडे करून एखाद्या योग्याच्या आवेशाने सभोवार पहात हलके हलके फिरावयास दूरवर जायचें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५०
जून

काही दिवसांनी योगेश थोर मनाने इतरांबद्दल असें बोलूं लागला—

'ह्यांच्या आपल्यांत भयंकर तफावत! विचार! त्यांना कसें कळणार माझें वागणें. जसा विचार आपण करतों तसा विचार करीत असतील का हे?... छे! छे: '

फावल्यावेळीं जुनीं पत्रें चाळावयाचीं. कुणी कधीतरी लिहिलें होतें 'तुमचा स्वभाव इतका लाघवी नि गोड आहे की सगळा जन्म तुमच्याच सहवासांत गेल्यास धन्यता वाटेल मला!'

कितीतरी पारायणें व्हायचीं त्या पत्राचीं; त्या व्यक्तीला योगेशचें साह्य एका नाजूक बाबतींत हवें होतें आणि ह्मणूनच...पण तरी योगेशने जपून ठेवलें होतें तें चिटोरें.

एकदां त्याच्या तर्कशास्त्राच्या नोटस्‌चा हव्यास धरणाऱ्याने त्याच्या वक्तृत्व कलेची तोंडभर स्तुति केली. एका पत्रांत नुकतेंच काढलेल्या मासिकाच्या संपादकाने त्याच्या लेखाची स्तुति केली. तो हीं असलीं पत्रें जपून ठेवीत असे. अलीकडे हींच पत्रें तो पुन्हा पुन्हा वाचायचा. कुठल्याशा वृत्तपत्रांत एकदा त्याचें नांव आलें होतें, तें पुन्हा पुन्हा कौतुकाने बघायचा.

'ही आपण मॅट्रिक पास झालों तेव्हा अमुक व्यक्तीने पाठविलेली तार. हें कॉंग्रेस सेशनचें आपल्याला विशेष मिळालेलें तिकिट तर ही अर्धवट जळलेली काडी...कुठली बरं?...अरे हो ती नाही का?...आपल्या आयुष्यांतला केवढा महत्वाचा दिवस तो. देशप्रसिद्ध × × च्या सहवासांत आपण अर्धा तास घालविला आणि सगळ्या बसलेल्या लोकांत त्यांनी आपल्याला काड्याची पेटी उचलावयाला सांगितली. आपण चटकन्‌ पुढं झालों व त्यांची सिगारेट पेटविली— आणि चटकन्‌ लोकांची नजर चुकवून ही अर्धवट जळलेली काडी खिशांत घातली. त्यांना आपल्यांत कांही विशेष दिसलें असेल ह्मणून तर आपल्याला...'

वैतागून जाऊन त्याने तीं सगळीं पत्रें, आणि ती अर्धवट जळलेली काडी जाळून टाकली, आणि त्याची राख एका बाटलींत भरून ठेवली. येता जाता त्या बाटलीकडे बघायचें आणि स्वत:ची पाठ थोपटावयाची...

आणि मग एक दिवस ह्याचा कंटाळा येऊन आत्मशुद्धीच्या हेतूने त्याने तो डायरीच्या तुकड्याने भरलेला लिफाफा आणि ती बाटली नदींत नेऊन टाकली.

आणि चार दिवसांनी अगदी स्वस्थ राहवेना म्हणून आपल्या मानसिक घडपडीचें चित्र रेखाटून एका मासिकाकडे पाठविलें!

———

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यरात्र उलटली

मध्यरात्र उलटली
सातऋषी कललेले
अंधाराच्या कुशीमध्यें
विश्व गाढ झोपलेलें

विश्व गाढ झोपलेलें
माझी मिटेना पापणी
उलटली अर्धी रात्र
अजूनीहि जागाच मी

अजूनीहि जागाच मी
दीर्घ उसासे ढाळीत
खोल आकाशांतील
साद आवाज ऐकीत

साद आवाज ऐकीत
रातकिड्यांचे, श्वानांचे
कुठेतरी घुमणारे
ठोके मोजीत तासांचे

ठोके मोजीत तासांचे
तळमळत.... जागत
राहिलेलीहि अशीच
जाईल सरून रात

जाईल सरून रात
आणि....उगवेल दीस
हळूहळू फुलापरी
उमलेल विश्वकोष

उमलेल विश्वकोष
प्रकाशांत चैतन्यांत
माझें असेंच राह्याचें
तिमिरांकित हें चित्त!

—राम देशमुख

卐

'युगवाणी'ची छपाई

'युगवाणी'ची छपाई आकर्षक व नीटनेटकी होत असल्याचें विदर्भ साहित्य संघाच्या कित्येक सभासदांनी लिहून कळविलें आहे.

मराठीच काय, पण इंग्रजी, हिंदी भाषेतील आकर्षक व निरनिराळ्या डिझाईनची सुबक छपाई आमच्या मुद्रणालयांत होत असते.

वेळेवर काम, सुंदर ग्रंथमुद्रण, उत्कृष्ट बांधणी हीं आमचीं वैशिष्ट्यें आहेत.

हरिहरेश्वर मुद्रणालय, महाल चौक, नागपूर शहर.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाणी विलास

विलासी

(१) विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष व आजचे उपाध्यक्ष श्री. पु. य. उर्फ बाबासाहेब देशपांडे यांची मध्यवर्ती विधान सभेत जी अविरोध निवड झाली, ती निःसंशय योग्यच झाली. त्यांच्या कार्यक्षमतेला हें नवें दालन खुलें झालें. या त्यांच्या यशांत विदर्भ साहित्य संघालाहि भूषण आहे. त्यांचें अत्यंत मनःपूर्वक अभिनंदन 'विलासी'ला करावयाचें आहे.

(२) महाराष्ट्राला केंद्रस्थानाची योग्यता असलेल्या मुंबानगरींत गेल्या महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यांत महाराष्ट्र साहित्य संमेलनाचा सोहळा अत्यंत यशस्वी रीतीने सिद्ध झाला. मुंबईचे संघटना कुशल व साहित्य संघाचे आधारस्तंभ डॉ. भालेराव, नामवंत डॉ. वाडसाहेब, निरलस कार्यकर्ते श्री. वा. रा. ढवळे, उत्सव उल्हासी श्री. प्रभाकर पाध्ये, प्रा. वा. ल. कुळकर्णी, प्रा. रामभाऊ जोशी यांच्या प्रयत्नांना यश आलें व चारी दिशांना पांगलेला मराठ-मोळा या सम्मेलनाच्या निमित्ताने त्यांनी पांच दिवस मुंबापुरीला जमविला. त्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून दिली, ज्ञानदान केलं, त्यानी करमणुक केली. शिरगणतीचा व संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मराठमोळ्याच्या जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे.

विदर्भाच्या दृष्टीने बोलावयाचें म्हणजे एकतर विदर्भांतील बरीच मंडळी मुंबईला गेली व आपल्या वैशिष्ट्याने गाजली व दुसरें, तेथे वि. सा. सं. व महाराष्ट्र सा. सं. यांच्यांत एकोपा व कार्यसंगतीच्या दृष्टीने अनौपचारिक चर्चा झाली. यांतून काय निघेल, निघेल किंवा नाही हें योग्य की अयोग्य इ. मुद्दे महत्त्वाचे असतीलहि व ते महत्त्वाचे म्हणून वृत्तपत्रांनी त्यांचा साधक बाधक समाचार घेतलाहि. पण चार विचारवंत मंडळी एकत्र जमून जिव्हाळ्याच्या प्रश्नासंबंधी बोलतात हेंच शुभलक्षण कित्येक प्रसंगी मानावें लागतें. जोवर या चर्चेतून कांही अनुचित निघत नाही तोवर हें जें घडलें तें योग्य व भल्याकरितांच अशी श्रद्धा टेवल्याशिवाय कार्य पुढे रेटलेंच जात नाही. विलासीची या बाबत विचाराची दिशा श्रद्धेची व वि. सा. सं.ची व विदर्भाची जी मंडळी तिथें गेली त्यांच्या सद्-हेतूवरच्या विश्वासाची आहे.

(३) विलासीकडे परवां एक पत्र आलें. युगवाणी सारख्या मासिकांत व विशेषत: 'वाणीचे संपादक लोकसाहित्याचे अभ्यासक असूनहि लोकसाहित्याचा परामर्श 'वाणीमध्ये कां येत नाही ! अशी प्रेषकाची तक्रार आहे. त्याने कु. दुर्गा भागवत यांनी 'साहित्य' मासिकाच्या ताज्या अंकांत लिहिलेल्या लोकसाहित्यावरील विस्तृत सुंदर, व अभ्यासनीय लेखाकडे 'विलासी'चें लक्ष वेधलें आहे. विलासीने तें पत्र स्वतःचे 'कृपेने विचार व्हावा' असें मत संपादकांना सादर केलें आहे. त्याचा निर्णय संपादक काय घेतील तो पुढील अंकीं कळेलच.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुंबईच्या महाराष्ट्र-साहित्यसंमेलनाचा अत्यंत महत्त्वाचा ठराव

☆

" हिंदी संघराज्यांतील एकूण लोकसंख्येची शिरगणती लवकरच होणार असून या गणतींत नागरिकांच्या भाषेचा उल्लेख प्रधान आहे. यामुळे या शिरगणतीला भाषावार राज्यरचनेच्या दृष्टीनें अत्यंत महत्व प्राप्त होत आहे. विशेषतः महाराष्ट्राच्या सरहद्दीचें व सरहद्दीलगतचे जे भाग आहेत त्यांचें भाषिक स्थान या शिरगणतीच्या माहितीवरून स्पष्ट होणार असून कारवार, हल्याळ, सुपा, बेळगांव, शहापूर, सोलापूर, ठाणें जिल्ह्यांतील कांहीं भाग, डांग, बस्तर संस्थान, छिंदवाडा, बालाघाट वगैरे सारख्या सीमेवरील भागांच्या भाषिक व राजकीय भवितव्यावर निःसंशय परिणाम होणार आहे. म्हणून या शिरगणतीच्या वेळी भाषिक माहिती योग्य रीतीनें नमूद करून घेण्यासाठी महाराष्ट्र साहित्य परिषदेने स्वतः व इतर संस्थांच्या सहकार्यानें जोरदार प्रयत्न व प्रचार आतापासून सुरू करावा व स्वयंसेवक दल उभारून हें नोंदणीचें कार्य योग्य तऱ्हेने पार पाडून घ्यावें व दोन्ही भाषांचे गणक सरकारकडून नेमून घ्यावे असा आदेश हें संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषदेस देत आहे. तसेंच हें कार्य करण्यासाठी परिषदेने जरूर तर स्वतंत्र निधि उभारावा असें हें संमेलन ठरवीत आहे. "

मराठी भाषेच्या व साहित्याच्या हिताचें हें केवढें तरी मोठें विधायक कार्य आहे. बैतूल, छिंदवाडा, बालाघाट, भंडारा, बस्तर इ. जिल्ह्यांतून मराठीभाषी माणूस हा मराठी भाषी म्हणूनच नोंदला गेला पाहिजे. आज ही महत्त्वाची गोष्ट नजरेआडून निसटली तर नेहमीसाठी पस्तावावें लागेल.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

युगवाणी कार्यालय, धरमपेठ, नागपूर.

मुद्रक, प्रकाशक : प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ